जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# गोव्याच्या अधिकाऱ्यांना आता महाराष्ट्रात मिळणार ड्रोनचे धडे : प्रशिक्षणासाठी 'अमृत' संस्थेची निवड

नगर – महाराष्ट्र शासनाच्या 'अमृत' संस्थेच्या कामाची दखल आता थेट शेजारच्या गोवा सरकारनेही घेतली आहे. 'अमृत'तर्फे दिले जाणारे ड्रोन प्रशिक्षण अत्यंत दर्जेदार असल्याने, गोवा सरकारने आपल्या ३० अधिकाऱ्यांना या प्रशिक्षणासाठी निवडले आहे. तसा अधिकृत प्रस्तावच गोवा सरकारने मंजूर केल्याची माहिती 'अमृत'चे व्यवस्थापकीय संचालक विजय जोशी यांनी दिली आहे.

'अमृत' (महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी) ही पुणे मुख्यालय असलेली एक स्वायत्त संस्था आहे. खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील तरुणांना स्वतःच्या पायावर उभे करण्यासाठी ही संस्था काम करते. याचाच एक भाग म्हणून 'अमृत ड्रोन मिशन' चालवले जाते. विशेष म्हणजे, हे उच्च दर्जाचे प्रशिक्षण गरजू विद्यार्थ्यांसाठी पूर्णपणे मोफत असते. आतापर्यंत १०० हून अधिक जणांनी याचा लाभ घेतला असून त्यांना चांगला रोजगारही मिळाला आहे.

सध्या शेती फवारणी, जमिनीची मोजणी, सरकारी पाहणी व व्हिडिओग्राफीसाठी ड्रोनचा वापर खूप वाढला आहे. त्यामुळे या क्षेत्रात कुशल लोकांची मोठी गरज आहे. 'अमृत' संस्थेचा यातील अनुभव आणि दर्जा पाहून, गोवा सरकारच्या नियोजन व सांख्यिकी विभागाने त्यांच्या ३० अधिकाऱ्यांना येथे प्रशिक्षित करण्याचा निर्णय घेतला आहे. गोव्याचे संचालक विजय सक्सेना यांनी तसे पत्रच संस्थेला पाठवले आहे.

राज्यातील जास्तीत जास्त तरुणांनी अमृत संस्थेच्या या प्रशिक्षणाचा लाभ घेऊन आपले करियर घडवावे, असे आवाहन श्री. जोशी यांनी केले आहे.

# अहिल्यानगर मनपा महापौरपदाच्या उमेदवारावर ओबीसी नेत्यांचा आक्षेप

## मूळ ओबीसीवर अन्याय होत असल्याचा आरोप, निवडणूक आयोगाकडे तक्रार करणार



नगर – अहिल्यानगर महापालिकेच्या महापौरपदासाठी राष्ट्रवादी काँग्रेसच्या ज्योती गाडे यांनी अर्ज दाखल केला आहे. या महापौर निवडीला राज्यातील ओबीसी संघटनेच्या नेत्यांनी हरकत घेतली आहे. ओबीसी महिलांसाठी राखीव असलेल्या या जागेवर ओबीसी जातीतील घटकांना रोटेशननुसार संधी द्यायला हवी, असे त्यांचे म्हणणे आहे. पुण्यात पत्रकार परिषद घेऊन या नेत्यांनी भूमिका मांडली आहे. महापौरपदाची निवडणूक झाल्यावर निवड़णूक आयोगाकडे तक्रार करणार असल्याचे सांगण्यात आले.

अहिल्यानगरचे महापौरपद ओबीसी महिलेसाठी राखीव आहे. तेथे राष्ट्रवादी काँग्रेसच्या ज्योती गाडे यांची उमेदवारी युतीकडून जाहीर झाली असून त्यांचा एकमेव अर्ज आहे. गाडे या ओबीसीमधील कुणबी घटकातील आहेत. यावर ओबीसी नेत्यांचे म्हणणे आहे की, ओबीसी नेत्यांचा मूळ आक्षेप हा केवळ व्यक्तीवर नसून, 'रोटेशन' पद्धतीनुसार ज्या ओबीसी उपजातींना संधी मिळायला हवी होती, त्यांना डावलले जात असल्यावर आहे. विशिष्ट राजकीय सोयीसाठी नियमांची पायमल्ली केली जात असल्याचा दावा त्यांनी केला आहे. या प्रक्रियेला स्थगिती द्यावी किंवा फेरविचार करावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

प्रस्थापित राजकीय पक्ष ओबीसी आरक्षणाचा वापर केवळ सत्तेसाठी करत आहेत, पण प्रत्यक्षात ओबीसी उमेदवारांना निर्णयप्रक्रियेत स्थान दिले जात नाही, असा आरोप नेत्यांनी केला. जर निवडणूक आयोगाने या हरकतीची दखल घेतली नाही, तर अहिल्यानगरमध्ये तीव्र आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे. निवडणूक आयोगाकडून सकारात्मक प्रतिसाद न मिळाल्यास उच्च न्यायालयात धाव घेण्याचेही संकेत या पत्रकार परिषदेत देण्यात आले. केवळ अहिल्यानगर नव्हे तर राज्यात जेथे जेथे असे प्रकार झाले आहेत, तेथील मुद्दाही त्यांनी मांडला.

पुण्यात झालेल्या पत्रकार परिषदेत ओबीसी जनमोर्चा आणि स्थानिक ओबीसी हक्क संरक्षण समितीच्या नेत्यांनी प्रमुख भूमिका मांडली. यासंबंधीची याचिका केलेले अ‍ॅड. मंगेश ससाणे, प्रकाश शेंडगे (अध्यक्ष, ओबीसी जनमोर्चा), प्रा. श्रावण देवरे (ओबीसी अभ्यासक आणि नेते), दशरथ राऊत (स्थानिक ओबीसी चळवळीतील सक्रिय नेते), बाळासाहेब कर्डिले आदींनी भूमिका मांडली.

### आरक्षण चोरीचा अहिल्यानगरचा 'विखे पॅटर्न'

या पत्रकार परिषदेनंतर ओबीसी नेते अ‍ॅड. मंगेश ससाणे यांनी आपल्या सोशल मिडीयावरही याबाबत एक पोस्ट शेअर केली आहे. त्यात त्यांनी म्हंटले आहे की, अहिल्यानगर महापौरपद ओबीसी महिलांसाठी राखीव झाले. पण महापौरपदाला मराठा उमेदवार? हा कायद्याचा आणि संविधानाचा अवमान आहे! अहिल्यानगर महापालिकेत एकूण ६८ पैकी १८ जागा ओबीसीसाठी राखीव होत्या. त्यावर ओरिजिनल १३ ओबीसी निवडून आले, ५ कुणबी निवडून आले. त्यानंतर महापौरपदाची सोडत झाली आणि महापौरपद ओबीसीला राखीव झाले. पण राष्ट्रवादी काँग्रेसने (अजित पवार गट) ज्योती गाडे यांची उमेदवारी जाहीर केली आहे. ही उमेदवार प्रभाग क्र. ३ ब मधून निवडून आल्या. हा प्रभाग सर्वसाधारण महिलासाठी राखीव होता.

तसेच गाडे यांनी शपथपत्रात स्वतः लिहिले आहे, जात : हिंदू मराठा! जात प्रमाणपत्र – निरंक (शून्य), जात पडताळणी प्रमाणपत्र – निरंक (शून्य)! ज्योती गाडे या स्व. आमदार शिवाजीराव कर्डिले यांच्या कन्या आहेत. या कुटुंबातील मोठी कन्या महापौर संदीप कोतकर यांची पत्नी, दुसरी कन्या आमदार संग्राम जगताप यांची पत्नी. संपूर्ण कुटुंब प्रतिष्ठित हिंदू मराठा समाजाचे, हे सर्वश्रुत आहे! मग प्रश्न हे आहेत: ओबीसीसाठी राखीव पदावर मराठा उमेदवार उमेदवारी कशी दाखल करते? जात प्रमाणपत्र नसताना अर्ज कसा स्वीकारला जातो? जर प्रमाणपत्र असेल तर शपथपत्रात का लपवलं? हिंदू मराठा असून ओबीसी प्रमाणपत्र कसं ?

या निवडणुकीत १८ ओबीसी राखीव जागांपैकी १३ जागांवर खरे ओबीसी उमेदवार निवडून आले, पण ५ जागांवर मराठा समाजातील व्यक्तींनी बोगस ओबीसी दाखले घेऊन जिंकल्या. आता महापौर पदावरही हाच प्रकार? ही आरक्षण चोरी आहे. घटना आणि कायद्याचे सरळ सरळ उल्लंघन आहे. सत्ता–संपत्तीच्या जोरावर मागासवर्गीयांच्या संवैधानिक हक्कांना हिसकावलं जात आहे. स्थानिक लोक सगळं जाणतात, पण कोण बोलायला नाहीत. संग्राम जगताप राष्ट्रवादीत, राधाकृष्ण विखे पाटील (मराठा समाज मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष) भाजपात, सगळं पै पाहुण्याचे, मेहुणा, जावयाचे राजकारण. चंद्रशेखर बावनकुळे, अतुल सावे यांसारखे मंत्री ओबीसी आरक्षण संरक्षित करण्यात अपयशी ! ४ फेब्रुवारीला अजित पवारांचा फोन कॉल व्हायरल झाला, 'सर्व जाती–धर्मांना एकत्र घेऊन जाणार'. पण त्यांच्या पक्षातच मनमानी ? त्यांच्या शब्दांना मान ठेवणार की नाही? ओबीसी हक्कांचे रक्षण कोण करणार? ही राज्य सरकारची जबाबदारी आहे! ओबीसी कार्यकर्ता म्हणून मी ठाम मागणी करतो: या प्रकरणाची तातडीने चौकशी व्हावी दोषींवर कठोर कारवाई व्हावी ओबीसी समाजाच्या संवैधानिक हक्कांचे रक्षण व्हावे! असेही ओबीसी नेते अ‍ॅड. मंगेश ससाणे यांनी या पोस्टमध्ये म्हंटले आहे.

# ओबीसी संघटनांचा 'लकवा' की राजकीय लाचारी? महापौर निवडीने 'रिमोट कंट्रोल' राजकारण उघड!

## अहिल्यानगर जिल्ह्यातील संघटनांना आणि 'मूळ ओबीसी' कार्यकर्त्यांचा एकत्र येण्याचे आवाहन






योगेश साठे

नगर – अहिल्यानगर महानगरपालिकेच्या महापौर आणि उपमहापौर पदाची निवड प्रक्रिया नुकतीच पार पडली. महापौरपदी ज्योती गाडे स्व.आमदार शिवाजीराव कर्डिले यांच्या कन्या व अमोल गाडे यांच्या पत्नी, तर उपमहापौरपदी धनंजय जाधव यांची वर्णी लागली आहे. सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) आणि भाजपच्या प्रस्थापित नेत्यांनी या निवडीतून आपली राजकीय सोय लावून घेतली असली, तरी या प्रक्रियेत 'मूळ ओबीसी' कार्यकर्त्यांच्या निष्ठेचा जो बळी दिला गेला आहे, तो अत्यंत क्लेशदायक आहे.

ओबीसी महिला प्रवर्गासाठी राखीव असलेले महापौरपद हे समाजातील सामान्य आणि कर्तृत्ववान महिलेला नेतृत्व देण्याची संधी होती. मात्र, प्रस्थापित नेत्यांनी या संधीचा वापर केवळ आपल्या घरातील व्यक्तींचे पुनर्वसन करण्यासाठी किंवा कोणाचे तरी राजकीय 'सांत्वन' करण्यासाठी केला. जेव्हा पदं 'गुणवत्तेवर' नाही तर 'नातेसंबंधांवर' आणि नेत्यांच्या 'मनधरणीसाठी' वाटली जातात, तेव्हा आरक्षणाचा मूळ हेतूच संपुष्टात येतो.

सत्ताधारी पक्षात अनेक असे ओबीसी चेहरे आहेत ज्यांनी वर्षानुवर्षे सतरंज्या उचलल्या, पक्षाचा झेंडा खांद्यावर घेऊन लाठ्याकाठ्या खाल्ल्या. मात्र, सत्ता भोगण्याची वेळ आली की प्रस्थापितांना आपलेच 'वारसदार' आठवतात. पक्ष वाढवायला मूळ ओबीसी आणि पदं भोगताना नेत्यांचे जवळचे, ही नवी राजकीय संस्कृती निष्ठावंतांची गळचेपी करणारी आहे.

### दिवंगत अजित पवारांच्या कणखर नेतृत्वाची उणीव

आज अहिल्यानगरच्या कार्यकर्त्यांना प्रकर्षाने आठवण येतेय ती दिवंगत नेते अजित पवार यांची. अजित दादा हयात असते, तर त्यांनी असा अन्याय होऊन दिला असता का? कार्यकर्त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणारे आणि प्रस्थापितांच्या 'हट्टाला' लगाम घालणारे त्यांचे नेतृत्व असते, तर आज 'मूळ ओबीसी' कार्यकर्त्यांवर ही नामुष्की आली नसती. त्यांच्या निधनानंतर निर्माण झालेल्या या नेतृत्वाच्या पोकळीचा गैरफायदा घेऊन प्रस्थापितांनी आपले घोडे पुढे दामटले आहे. जिल्ह्यातील ओबीसी संघटनांना जणू 'लकवा' भरला आहे की काय, असा प्रश्न पडतोय. महापौर निवडीसाठी जिल्ह्याबाहेरील नेत्यांनी हस्तक्षेप करावा लागणे, ही अहिल्यानगरच्या स्थानिक स्वाभिमानासाठी लाजिरवाणी गोष्ट आहे. सत्ताधारी पक्षातील स्थानिक ओबीसी नेते झोपेचे सोंग का घेत आहेत? स्वतःच्या राजकीय अस्तित्वासाठी समाजाचा बळी देणारे हे नेते आता समाजाला काय उत्तर देणार?

आता गरज आहे 'चतु:शक्ती'च्या दबाव गटाची! हा अन्याय मोडून काढण्यासाठी आता केवळ चर्चा करून चालणार नाही. अहिल्यानगरमध्ये आता 'युवा, अनुभवी कार्यकर्ते, बुद्धीजीवी आणि स्वाभिमानी ओबीसी नेते' यांची एकत्रित मोट बांधणे काळाची गरज आहे. ही वेळ 'संयुक्त बैठकीची', 'मजबूत संघटनेची' आणि प्रस्थापितांच्या 'रिमोट कंट्रोल' राजकारणाला आरसा दाखवण्याची आहे. पदे मिळतील आणि जातील, पण स्वाभिमान विकून मिळालेली सत्ता समाजाचे भले करू शकत नाही. अहिल्यानगरमधील 'मूळ ओबीसी' कार्यकर्त्यांनी आता एकत्र येऊन या 'सांत्वन राजकारणा'विरुद्ध एल्गार पुकारला पाहिजे. जोपर्यंत आपण स्वतःचा दबाव गट निर्माण करत नाही, तोपर्यंत प्रस्थापित नेते आपला वापर केवळ मतदानाचे यंत्र म्हणून करत राहतील.

जागे व्हा! संघटित व्हा! आणि निष्ठेचा अधिकार हिसकावून घ्या! असे अहिल्यानगरमधील या राजकीय घडामोडींवर योगेश साठे जिल्हाध्यक्ष, वंचित बहुजन आघाडी, अहिल्यानगर यांनी मत व्यक्त केले असून, त्यांनी जिल्ह्यातील सर्व सामाजिक संघटनांना हा अन्याय रोखण्यासाठी आणि 'मूळ ओबीसी' कार्यकर्त्यांचा स्वाभिमान जपण्यासाठी एकत्र येण्याचे जाहीर आवाहन केले आहे.

## सत्यनारायण झंवर यांचे अल्प आजाराने निधन



नगर – कराचीवालानगर येथील रहिवासी सत्यनारायण एकनाथ झंवर (मामा) (वय ७७) यांचे ५ फेब्रुवारी रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे ३ मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. संदीप, सचिन, पंकज झंवर यांचे ते वडील तर गौरव, गोविंद, गोपाल यांचे ते आजोबा होत.

## मयुर पवार यांचे हृदयविकाराने निधन



नगर – खिस्तगल्लीतील रहिवासी मयुर कृष्णराव पवार (वय ४२) यांचे ३ फेब्रुवारी रोजी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे आई, वडील, पत्नी, १ भाऊ, भावजया, १ मुलगा, १ मुलगी असा परिवार आहे. खिस्तगल्लीतील अन्नपूर्णा भोजनालयाचे ते संचालक होत.

## संजय शिंगवी यांचे हृदयविकाराने निधन




नगर – महावीरनगर येथील रहिवाशी संजय मोतीलाल शिंगवी (वय ५०) यांचे ५ फेब्रुवारी रोजी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव, अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्यामागे एक मुलगा, दोन मुली, तीन भाऊ, भावजया, सूना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. राजेंद्र, प्रमोद शिंगवी यांचे ते छोटे बंधू तर सनी शिंगवी यांचे वडिल होत.

## शेखर भावे यांचे अल्पशा आजाराने निधन



नगर – सहकारनगर येथील शेखर पुरुषोत्तम भावे (वय ७४) यांचे ३० जानेवारी रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, सून, नात असा परिवार आहे. ते पाटबंधारे खात्यामधुन अभियंता पदावरून निवृत्त झाले. त्यानंतर त्यांनी जनजाती कल्याण आश्रमच्या कामात झोकुन दिले होते, त्या माध्यमातून त्यांनी आदिवासी भागातील विकासासाठी व कल्याणासाठी मोठे योगदान दिले. आपल्या मनमिळाऊ स्वभावामुळे त्यांचा मित्र परीवार देखील मोठा होता.

## भारत कुलकर्णी यांचे निधन



नगर – सावेडी उपनगरातील भारत नारायणराव कुलकर्णी (वय ७७) यांचे अल्प आजारानंतर नुकतेच दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

## शालनबाई जाधव यांचे वृद्धापकाळाने निधन



श्रीगोंदा – गार (ता. श्रीगोंदा) येथील रहिवासी श्रीमती शालनबाई लक्ष्मण जाधव (वय ७५) यांचे ४ फेब्रुवारी रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर गार (ता. श्रीगोंदा) अमरधाम येथील भिमानदीतिरी अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे २ मुले, २ मुली, सुना, नातवंडे, जावई असा परिवार आहे. दिलीप जाधव, स्व. बाळासाहेब जाधव, महादेव जाधव, मंगल जाधव, छाया जाधव यांच्या त्या मातोश्री होत.

## कौशल्याबाई माने यांचे वृद्धापकाळाने निधन



श्रीगोंदा – कौठा (ता.श्रीगोंदा) येथील कौशल्याबाई रघुनाथ माने (वय ८०) यांचे ४ फेब्रुवारी रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर कौठा (ता.श्रीगोंदा) येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे ३ मुले, २ मुली, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. साहेबराव, राजाराम, संभाजी माने यांच्या त्या मातोश्री होत.





अहिल्यानगर शहरात महापालिकेच्यावतीने सलग दुसऱ्या दिवशी अतिक्रमण हटाव मोहीम राबविण्यात आली. यामध्ये आयुक्त यशवंत डांगे स्वत: सहभागी झाले होते. (छाया–बबलू शेख)

# अहिल्यानगर शहरात सलग दुसऱ्या दिवशी अतिक्रमण हटाव मोहीम; जुने बसस्थानक चौक ते माळीवाडा वेस रस्त्यावरील अतिक्रमणे हटविली

नगर – अहिल्यानगर महानगरपालिकेने शहरातील मुख्य रस्ते, फुटपाथ आणि सार्वजनिक ठिकाणची अनधिकृत अतिक्रमणे हटवण्यासाठी धडक मोहीम हाती घेतली आहे. आयुक्त यशवंत डांगे स्वत: या मोहिमेत रस्त्यावर उतरले आहेत. ४ फेब्रुवारीला आशा टॉकीज चौकातील अतिक्रमणे हटविल्यानंतर ५ फेब्रुवारीला सकाळ पासून जुने बसस्थानक चौक ते माळीवाडा वेस या रस्त्यावर ही मोहीम राबविण्यात आली.

महापालिकेच्या पथकाने ४ फेब्रुवारीला आशा टॉकीज चौकातील तात्या टोपे पुतळा ते माणिक चौकातील सेनापती बापट पुतळ्यापर्यंतच्या सर्व टपऱ्या, हातगाड्या अशी अतिक्रमणे हटविली होती. त्यामुळे या रस्त्याने मोकळा श्वास घेतला. ५ फेब्रुवारीला सकाळ पासून जुने बसस्थानक चौकातील अतिक्रमणे काढण्यास सुरुवात करण्यात आली. चौकातील अतिक्रमणे काढून साहित्य जप्त करण्यात आल्यानंतर ही मोहीम माळीवाडा वेस रस्त्यावर सुरु करण्यात आली. यात प्रामुख्याने जिल्हा परिषदेच्या संरक्षण भिंतीलगत अनेक टपऱ्या, पत्राशेड, हातगाड्यांची अतिक्रमणे होती. ती काढून टाकण्यात आली. दुपारपर्यंत १० ते १५ टपऱ्या काढण्यात आल्या. विशेष म्हणजे यात काही मटक्याच्या टपऱ्याही होत्या, काही शेड तयार करण्यात आले होते. ते ही काढून साहित्य जप्त करण्यात आले.

या अतिक्रमण हटाव मोहिमेत आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे स्वत: सहभागी झाले होते. त्यांच्या समवेत अभियंता सुरेश इथापे, अतिक्रमण विरोधी विभाग प्रमुख आदित्य बल्लाळ, क्षेत्रीय अधिकारी नितीन इंगळे, क्षेत्रीय अधिकारी रिजवान शेख यांच्या सह अतिक्रमण विरोधी पथकातील कर्मचारी सहभागी झाले होते.

### टपरीसाठी अनधिकृत वीज जोड

जिल्हा परिषदेच्या संरक्षण भिंतीलगत असलेल्या टपऱ्या, पत्राशेड काढत असताना एका टपरीधारकाने जिल्हा परिषदेच्या भिंतीवर असलेल्या विजेच्या तारेवर आकडा टाकून अनधिकृत वीज कनेक्शन घेतले असल्याचे समोर आले. अतिक्रमण विरोधी पथकाने सदर टपरी तर हटविलीच शिवाय ते अनधिकृत वीज कनेक्शनही यावेळी कट केले.

# अहिल्यानगर शहरात ९ फेब्रुवारी रोजी 'शिकाऊ भरती मेळाव्या'चे आयोजन

नगर – राष्ट्रीय शिकाऊ मेळाव्याअंतर्गत कै. माणिकराव नरसिंगराव पाटील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, बुरूडगाव रोड, अहिल्यानगर येथे ९ फेब्रुवारी रोजी सकाळी १०.३० ते सायंकाळी ५ या वेळेत 'शिकाऊ उमेदवारी भरती मेळाव्याचे' आयोजन करण्यात आले आहे. शिकाऊ उमेदवारी मिळवू इच्छिणाऱ्या उमेदवारांनी या मेळाव्यास उपस्थित राहावे, असे आवाहन प्राचार्य के. ए. जहागीरदार यांनी केले आहे. मेळाव्याच्या ठिकाणी उमेदवारांनी उपलब्ध करून देण्यात आलेल्या लिंक अथवा क्यूआर कोडद्वारे नोंदणी करावी. तसेच दहावी उत्तीर्ण, आयटीआय उत्तीर्ण गुणपत्रक, शाळा सोडल्याचा दाखला, आधारकार्ड आदी मूळ कागदपत्रे व त्यांच्या छायांकित प्रतीसह मेळाव्यास उपस्थित राहावे.

# देहदानाने समाजासाठी अमर झाल्या शकुंतलाबाई गुगळे

### ९२ व्या वर्षी दिला मानवतेचा संदेश



नगर – अहिल्यानगर जिल्ह्यातील शेवगाव तालुक्यातील भातकुडगाव येथील मूळ रहिवासी असलेल्या गुगळे परिवाराने समाजासमोर एक प्रेरणादायी आणि विचारप्रवर्तक आदर्श निर्माण केला आहे. या कुटुंबातील आधारस्तंभ असलेल्या स्वर्गीय श्रीमती शकुंतला शंकरलाल गुगळे यांचे नुकतेच ९२ व्या वर्षी नाशिक येथे निधन झाले. त्यांनी मृत्यूपूर्वी पत्र व ऑडिओ कॅसेटद्वारे इच्छा व्यक्त केल्यानुसार त्यांच्या मृत्यू पश्चात नाशिक येथील मेडिकल कॉलेजमध्ये देहदान करण्यात आले.

त्यांचे मूळ गाव शेवगाव तालुक्यातील भातकुडगाव येथील शंकरलाल, कनकमल, सुवालाल गुगळे व सलाबतपूर निवासी सूरजबाई चूत्तर ही भावंडे, अनेक वर्षांपूर्वी अहिल्यानगर येथे वास्तव होते. शकुंतला गुगळे यांचे शिक्षण केवळ सातवीपर्यंत झाले असले, तरी आपल्या कष्ट, जिद्द आणि दूरदृष्टीच्या बळावर त्यांनी संपूर्ण कुटुंबाला उच्च शिक्षणाची वाट दाखवली. धार्मिक वृत्ती असतानाही कर्मकांड, अंधश्रद्धा व जुन्या रूढीपरंपरांना त्यांनी आयुष्यभर विरोध केला.

त्यांचे पती शंकरलाल गुगळे यांनी एका नामांकित कंपनीत सेवा बजावली. त्यांचे पुत्र डॉ. अनिल गुगळे हे नाशिकमधील सर्वांत जुने व प्रसिद्ध त्वचारोग तज्ज्ञ असून, दुसरे पुत्र नितीन गुगळे हे अमेरिकेत सॉफ्टवेअर इंजिनिअर असून स्नेहल लुणीया, ज्योती मल्हारा, जयु लुणीया या मुली, संपूर्ण गुगळे कुटुंब उच्चशिक्षित व सामाजिक भान जपणारे आहे. अनेक वर्षे त्यांचे वास्तव्य अहिल्यानगर येथे होते. जायंट्स ग्रुप ऑफ अहिल्यानगरचे संस्थापक व जायंट्स वेल्फेअर फाउंडेशनचे स्पेशल कमिटी सदस्य संजय गुगळे यांच्या मोठ्या काकू (बडी माँ) होते.

विशेष बाब म्हणजे, स्वर्गीय शकुंतलाबाई यांनी वयाच्या ९० व्या वर्षीच नेत्रदान व देहदानाबाबत स्पष्ट इच्छा व्यक्त करणारे पत्र लिहून ठेवले होते. मृत्यूनंतर कर्मकांड न करता आपला देह वैद्यकीय शिक्षणासाठी उपयोगी यावा, हा त्यांचा ठाम विचार होता. त्यांच्या इच्छेप्रमाणे नाशिक येथील एसएमबीटी मेडिकल कॉलेजमध्ये देहदान करण्यात आले.

यावेळी मेडिकल कॉलेजच्या डिन डॉ. मीनल मोघनकर व डेप्युटी डिन डॉ. धनंजय जाधव उपस्थित होते. त्यांनी देहदान व नेत्रदानाबाबत समाजात जनजागृती होणे अत्यंत आवश्यक असल्याचे सांगून, या संदर्भात शासन करीत असलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली. तसेच गुगळे कुटुंबियांनी समाजासमोर एक आदर्श ठेवला असल्याचे प्रतिपादन केले.

जायंट्स ग्रुपचे संजय गुगळे यांनी जायंट्स ग्रुपमार्फत राबविण्यात येणाऱ्या रक्तदान, नेत्रदान व देहदान चळवळीबाबत आपले विचार व्यक्त केले. स्वर्गीय शकुंतलाबाई यांचे देहदानाबाबतचे उच्च व पुरोगामी विचार समाजाला निश्चितच प्रेरणा देणारे असल्याचे त्यांनी नमूद केले.

स्वर्गीय शकुंतलाबाई यांच्या अखेरच्या काळात डॉ. अनिल गुगळे व सौ. सुरेखा गुगळे यांनी अत्यंत प्रेमाने व समर्पित भावनेने त्यांची सेवा केली. आईच्या विचारांप्रती निष्ठा राखत त्यांनी तिची शेवटची इच्छा पूर्ण करून समाजासमोर एक दीपस्तंभ उभा केला.

# गृहिणी

## आरोग्य

### साखर सोडण्याचे हेल्दी लाभ

साखर सोडण्याचा निर्णय हा तुमच्या आयुष्यातील सर्वात आरोग्यदायी निर्णयांपैकी एक असू शकतो. साखरेचे प्रमाण कमी झाल्यामुळे रक्तातील ट्रायग्लिसरायड्स कमी होतात आणि रक्तदाब नियंत्रित राहण्यास मदत होते. साखरेमुळे 'ग्लायकेशन' नावाची प्रक्रिया होते जी त्वचेतील कोलेजन नष्ट करते. साखर सोडल्यामुळे वृद्धत्वाची प्रक्रिया मंदावते. साखरेमुळे रक्तातील शर्करा अचानक वाढते आणि कमी होते, ज्यामुळे मूड स्विंग्स होतात. साखर सोडल्याने तुम्ही दिवसभर अधिक आनंदी आणि शांत राहता. विकत घेताना सॉस, बिस्किटे आणि पाकीटबंद खाद्यपदार्थांमधील 'हिडन शुगर' तपासा. साखरेऐवजी खजूर, सुका मेवा किंवा अल्प प्रमाणात मध यांचा वापर करा. जेव्हा साखरेची ओढ वाटेल तेव्हा एक ग्लास पाणी प्या, यामुळे इच्छा कमी होते. कोल्ड ड्रिंक्स आणि पॅकेट ज्यूस यात साखरेचे प्रमाण प्रचंड असते. यात चव वाढवण्यासाठी साखर वापरली जाते.

## पाककला

### हक्का मॅगी

**साहित्य :** १ वाटी पाणी, २ पॅकेट मॅगी, २ टेबलस्पून चिरलेला कांदा, २ टेबलस्पून चिरलेला गाजर, २ टेबलस्पून चिरलेली भोपळी मिरची, १ टेबलस्पून लाल मिरची, १ टेबलस्पून गरम मसाला, १/२ टेबलस्पून काळी मिरी पावडर, १ टेबलस्पून बारीक चिरलेला लसूण, १ टेबलस्पून बारीक चिरलेली हिरवी मिरची, १ टेबलस्पून पांढरा व्हिनेगर १ टेबलस्पून सोया सॉस, १ टेबलस्पून टोमॅटो सॉस

**कृती :** सर्वात आधी एका पॅनमध्ये पाणी घालून उकळी आणा. नंतर, मॅगीचे दोन पॅकेट फोडून घाला. तसेच, १ टेबलस्पून तेल आणि १/२ टेबलस्पून मीठ घाला. मॅगी उकळत असताना, ती मऊ झाली की, ती गाळून घ्या, त्यावर थंड पाणी घाला आणि बाजूला ठेवा. आता, एका पॅनमध्ये २ टेबलस्पून तेल घाला. तेल गरम होऊ द्या, नंतर चिरलेला लसूण आणि हिरव्या मिरच्या घाला आणि तळा. यानंतर, तुम्हाला पॅनमध्ये कांदे, गाजर आणि सिमला मिरच्या घालून त्या तळाव्या लागतील. जर तुम्ही हक्का मॅगी आधीच तयार केली आणि भाज्या चिरून बाजूला ठेवल्या तर मॅगी बनवण्यासाठी तुम्हाला फक्त ५ मिनिटे लागतील. तसेच पॅनमधील घटकांमध्ये थोडे मीठ घाला. भाज्या शिजल्यानंतर, मॅगी मसाला, सोया सॉस, टोमॅटो सॉस, चिली सॉस, रेड चिली सॉस, व्हिनेगर इत्यादी घाला आणि थोडा वेळ शिजवा. यानंतर, पॅनमध्ये आधीच उकडलेली मॅगी घाला आणि भाज्यांमध्ये चांगले मिसळा. गरम असतानाच सर्व्ह करावे.

## वास्तू

### कामाचे टेबल असे असावे

* कामाचे टेबल आयताकृती किंवा चौकोनी असावे. गोल किंवा वाकड्या टेबल टाळा.

* टेबल टॉपचा रंग पांढरा, दुधाळ किंवा मलई असेल किंवा इतर रंग फिकट किंवा फिकट रंग असतील तर उत्तम. साधा काच देखील ठेवू शकता.

## सौंदर्य

चेहरा स्वच्छ करण्यासाठी कोरफडीची साल साल उलटी करा आणि चेहऱ्यावर घासावे.

## सल्ला

अस्सल पैठणी ओळखण्यासाठी तिचा पदर दोन्ही बाजूंनी एकसारखा दिसतो. पदरावरील मोर, पोपट किंवा फुले ही विणलेली असतात, वरून छापलेली नसतात.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## दैनिक पंचांग

शुक्रवार, दि. ६ फेब्रुवारी २०२६

**---, शके १९४७ विश्वावसुनामसंवत्सर, माघ कृष्णपक्ष, हस्त २४|२४, सूर्योदय ०६ वा. ४२ मि. सूर्यास्त ०५ वा. ३१ मि.**

### राशिभविष्य

**मेष :** अडकलेला पैसा मिळेल. गूढ अनुसंधान करणाऱ्यांसाठी शुभ. गैरसमज दूर होतील.

**वृषभ :** आपल्या विवेक बुद्धिच्या उलट काम झाल्याने हानि होऊ शकते. नियंत्रण ठेवा.

**मिथुन :** आपल्या प्रयत्नाने उन्नति कराल. धनलाभ होईल. वरिष्ठांची मर्जी राहील. आपल्या प्रयत्नांमुळे व्यापारात वृद्धि होईल.

**कर्क :** आपल्या यशाचा मूळ मंत्र कोणत्याच कामाला अशक्य न समजणे आहे. मित्रांचा सहयोग मिळेल.

**सिंह :** कामाला वाव मिळेल. आपले निर्णय, विचार दुसऱ्यांवर थोपू नका.

**कन्या :** लाभाच्या संधी. नवीन ओळखी संभवतात. आपल्या बुद्धि आणि तर्काने कार्यात यशाची शक्यता.

**तूळ :** संपत्तीच्या कामात यश मिळण्याचे योग. मनात नवीन कल्पना सुचतील.

**वृश्चिक :** आपल्या महत्वाकांक्षेमुळे यश मिळू शकेल.

**धनु :** व्यापारिक लाभ आणि सुख-समृद्धि वाढेल.

**मकर :** सामाजिक यश. नवीन कार्य सुरू करू नका. विरोधकांपासून दूर रहा. यश मिळणार नाही.

**कुंभ :** अनपेक्षित फायदा करून देणाऱ्या काही घटना घडतील. वेळेचे महत्व समजा. घरात मंगल कार्य होतील.

**मीन :** आर्थिक आणि सामाजिक कामांमुळे अडथळे. कामांची गती मंदावेल. शांत रहा. व्यापारात नवीन करार होतील.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## फिल्मीचक्कर क्र. १२२३ सौ. शैलजा कुलकर्णी

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | २ | ३ | | ४ | ५ | ■ |
| | ■ | ६ | | ■ | ७ | | ८ |
| ९ | | | ■ | १० | ■ | ११ | |
| ■ | ■ | ■ | १२ | | | | ■ |
| १३ | | ■ | ■ | | ■ | १४ | १५ |
| | ■ | १६ | | | ■ | १७ | |
| १८ | | | ■ | ■ | १९ | ■ | |
| | ■ | २० | | | | ■ | ■ |

**आडवे शब्द :-** १) अनिल कपूर, तब्बू, सलमानखान, करिश्मा कपूर, सुस्मिता सेन यांचा एक चित्रपट ६) राजू ++ गया जंटलमन (चित्रपटाचे नाव) ७) इमान +++ (चित्रपटाचे नाव) ९) अनिल कपूर, विजयाशांती, आशा सचदेव यांचा एक चित्रपट ११) मेरे ++ की गंगा और तेरे मन की जमना का बोल राधा बोल संगम (गाणे) १२) अशोककुमार, राजेश खन्ना, नूतन, मौसमी चटर्जी, विनोद मेहरा यांचा एक चित्रपट १३) ++ तुम एक कमरे मे बंद है और चाबी (गाणे) १४) ++ मुराद (एक अभिनेता) १६) गंगा की +++ (चित्रपटाचे नाव) १७) ++मौजी (चित्रपटाचे नाव) १८) +++ नही देखा (चित्रपटाचे नाव) २०) कुमार गौरव, विजयता पंडित यांचा एक चित्रपट

**उभे शब्द :-** १) जितेंद्र, लीना चंदावरकर, मदन पुरी यांचा एक चित्रपट २) अनाडी +++ वन (चित्रपटाचे नाव) ३) ++ का फूल (चित्रपटाचे नाव) ४) हत्या, खून आदी अर्थांचा एक शब्द ५) अमोल पालेकर, स्वरूप संपत, उत्पल दत्त, शत्रुघ्न सिन्हा यांचा एक चित्रपटफ८) ++ का मीत (चित्रपटाचे नाव) १०) राजेश खन्ना, सिंपल कापडिया, विनोद मेहरा, १३) ++ तुम एक कमरे मे बंद है और चाबी (गाणे) अशोककुमार यांचा एक चित्रपट १४) ++ मुराद (एक अभिनेता) १६) गंगा की +++ (चित्रपटाचे नाव) १७) ++मौजी (चित्रपटाचे नाव) १८) +++ नही देखा (चित्रपटाचे नाव) २०) कुमार गौरव, विजयता पंडित यांचा एक चित्रपट १३) ++++ युग युग से गीत मीलन के (गाणे) १५) एक ++ है हम (चित्रपटाचे नाव) १६) + ++ पहले मुझे तुमसे प्यार था आज (गाणे) १९) ++ जंग (चित्रपटाचे नाव)

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार :** एक सुंदर स्त्री हिरा आहे, मात्र एक थोर स्त्री हिऱ्यांचा खजिना आहे.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### साबण लवकर का वितळतो का?

साबण साठवण्यासाठी प्रत्येक घरात सोपकेस वापरले जातात. तथापि, सतत वापरल्याने ते लवकर वितळतात. तसेच आपण सर्वजण आंघोळीसाठी, हात धुण्यासाठी आणि कपडे धुण्यासाठी साबण वापरतो. तसेच पाण्यामुळे पॅकेजमधून साबण काढून टाकल्यानंतर साबण लवकर वितळतो. साबणाच्या डब्यात ठेवला तरी तो वितळत राहतो. कधीकधी, साबण फक्त दोन दिवसांत संपतो. यामुळे घरातील महिलांना तो जास्त काळ कसा टिकवायचा याचा गोंधळ उडतो.

ड्रेनेज असलेली सोप डिश वापरा नेहमी सोप डिश वापरा ज्यामध्ये छिद्रे किंवा तळाशी जाळी असेल जेणेकरून वापरल्यानंतर साबणातून पाणी सहज निघून जाईल. तसेच, साबण पाण्यात राहू देऊ नका. यामुळे तुमचा साबण जास्त काळ टिकेल. कोरड्या जागी साठवा आंघोळ केल्यानंतर, साबण शॉवर किंवा नळापासून दूर कोरड्या जागी ठेवा. तसेच, बाथरूममध्ये चांगले वायुवीजन सुनिश्चित करा. वायुवीजनाच्या अभावामुळे होणारी ओलावा देखील साबण वाळण्यास कारणीभूत ठरू शकते.

### खरे मित्र

एक राधा नावाची मुलगी आपल्या वडिलांसह राहायची. तिची आई ती लहान असतानाच वारली. ती घरातील सर्व कामे करून शाळेत जायची. शाहेत जाताना ती वाटेत एका जागी पाखरांना खायला दाणे द्यायची. तिच्या घरात देखील दोन पाखरे होती. ती त्यांना दररोज दाणे द्यायची. एके दिवशी तिला पाखरांना दाणे घालताना एका जमीदाराच्या मुलाने बघितले. त्या मुलाने घरी जाऊन आपल्या वडिलांना मला राधाशी लग्न करावयाचे आहे असे सांगितले.


जमीदाराने राधाच्या वडिलांशी बोलणी करून त्यांचे लग्न लावून दिले. राधाने आपल्यासह ते दोन पाखरे देखील सासरी आणली. ती दररोज त्या पाखरांना दाणे घालायची .हे तिच्या सासूला आवडत नसे. तिची सासू त्या पाखरांना त्रास द्यायची. त्यांचे खाणे जमिनीवर फेकायची पाणी सांडून द्यायची. सासूला असं करताना राधाने बघितले. हे तिला अजिबात आवडले नाही तिने सासूला असं करू नका म्हणून सांगितले. त्यावर तिच्या सासूने तिलाच रागावले. या गोष्टींना बघता राधा खूप काळजीत राहू लागली. एके दिवशी तिच्या नवऱ्याने तिला काळजी करण्याचे कारण विचारले. त्यावर तिने घडलेले सर्व सांगितले. तिच्या नवऱ्याने तिला ह्याच्या वर उपाय म्हणून त्या पाखरांना बागेत मोकळ्या हवेत सोडायला सांगितले. राधाने तसेच केले. ती बागेत जाऊन त्यांना दाणे खायला द्यायची. आता पाखरं राधाचे चांगलें मित्र झाले होतो. ते पाखरे राधा च्या घरात देखील येऊ लागले. राधाच्या सासूला हे कळतातच ती फार रागावली आणि राधाला तिच्या घरी सोडायला गेली.

वाटेतून जाताना काही दरोडेखोरांनी राधाच्या सासूचे दागिने लुटण्याचे प्रयत्न करत असताना राधाच्या सर्व पाखरे मित्रांनी दरोडेखोरांवर हल्ला केला. अचानक झालेल्या हल्ल्याला बघून दरोडेखोरांनी पळ काढला. त्यानंतर राधाची सासू आणि राधा घरी परत आले.

आता राधाच्या सासूची मते पाखरांसाठी बदलली होती. तिने राधाला म्हटले की आता उद्या पासून आपण दोघी पाखरांना दाणे देण्यासाठी जाऊ आणि तुझ्या त्या दोन पाखरांना देखील घरी घेऊन येऊ.हे ऐकून राधा खूप आनंदी झाली.

तात्पर्य - नेहमी मुक्या प्राण्यांशी चांगला व्यवहार करावा.

## जीवन का अमृत (भाग १)



१४४. जीवन ज्योति आप के अंदर है; असल में आप उस ज्योति से ही जीवन पाते हैं, चाहे आप यह माने या ना मानें। आप में से हर एक को उस पवित्र ज्योति का अनुभव मिल चुका है। अब आपको अवश्य ही सदा उस पवित्र ज्योति के संपर्क में रहना चाहिए। यह अजन्मी और छाया विहीन है, सदा से एक ही रही है, बेजोड़ है। पूरी सृष्टि इसी ज्योति से उत्पन्न हुई और यही ज्योति हर एक दिल में रोशन है। सभी अपनी प्रकृति से दिव्य हैं और धर्म, इंसान में पहले से निहित इस दिव्यता का प्रकट होना है जीवन की ज्योति को इस जीवन में ही प्रकट करो। आप इस ज्योति को देखने वाले बनो, केवल अपने अंतर में ही नहीं, बल्कि सब में, क्योंकि यही ज्योति हर जगह प्रकाशित है, जल रही है और ऐसी कोई जगह नहीं; जहाँ यह नहीं।

जब आप इस ज्योति की खोज कर लेंगे

### अस्तित्व ही बदल जाएगा

और इसके अनुसार जीने लगेंगे, तो आपका सारा अस्तित्व ही बदल जाएगा। प्रेम आपमें समा जाएगा, आपके रोम-रोम से प्रवाहित होगा और सारे खोट को शुद्ध सोने में बदल देगा।

आपको मालूम होना चाहिए कि प्रेम जीवन का लक्ष्य भी है और इस लक्ष्य प्राप्ति का साधन भी। प्रेम, ज्योति और जीवन, एक ही दिव्यता के अलग-अलग पहलू हैं।

आप उस दिव्य (प्रभु या सतगुरु) का माध्यम बनने की कोशिश करें और तब दिव्यता आप में से बहने लगेगी। यह कोई असम्भव बात नहीं, बल्कि सभी इंसानी कोशिशों की अंतिम सीमा है। इस भौतिक संसार में, हमारा वास्ता अवश्य ही भौतिकता से पड़ेगा। हमें इस भौतिक शरीर का और इस भौतिक संसार का, जो कि हमें मिले हैं, ज्यादा से ज्यादा फायदा उठाना है।

दिव्य योजना के चलने में इनका एक महान उद्देश्य है भौतिकता वह सीढ़ी है, जिसके द्वारा आत्मा देहाभास से ऊपर उठती है और अलौकिक मंडल-आध्यात्मिक मंडल-अपने प्राकृतिक निवास स्थान में प्रवेश करती है। आप स्वयं को मिले साधनों का सर्वोत्तम उपयोग करना सीखें और अवश्य ही, जैसे रात के बाद दिन आता है, आपकी जीत होगी।

एक सच्चे ईसाई को रोज सूली (Cross) पर चढ़ना चाहिए। सूली द्योतक है, बाहें फैलाकर, खड़े हुए भौतिक शरीर का। आपको देहाभास से ऊपर आना है। आपको प्रभु के साम्राज्य में दोबारा जन्म लेना है। शिष्य को अवश्य ही पता होना चाहिए कि प्रतिदिन कैसे मरा जाता है, ताकि वह शाश्वत जीवन, जो कि समय और दूरी की सीमाओं से परे है, का आनंद उठा सके।

(क्रमश:)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## अंतरिक बल (भाग - २)

आप शांति की फैक्टरी हैं। सम्बन्धित लोग बाहर से थके टूटे आते हैं आप से कुछ स्थूल लेने आते हैं आप ने स्थूल सूक्ष्म दोनों प्राप्ति करवानी है, वह चाहे कैसे भी हों। अगर आप ये नहीं करेंगे तो अशांति बढेगी। वह आप से टकरायेंगे। आप की बुद्धि कमजोर होती जायेगी। अगर जरा भी किसी से मुख का टकराव या मन का टकराव होता है तो ये टकराव धूल है। धूल को झाड़ू से साफ करते हैं। तुरंत अव्यक्त मुरली पढ़ो या कोई सकारात्मक बुक पढ़ो और पढ़ते जाओ जब तक वह बात मन से न निकले। पढ़ना एक तरह झाड़ू का काम करता है। आप बुद्धिवान बनेंगे।

आज्ञा चक्र - ८९ - बुद्धि -५

आज तक हम यही सुनते और मानते आये हैं कि भगवान की याद

से आत्मा पावन बनती है, बुरे संस्कार शुद्ध हो जाते हैं। वास्तव में आत्मा पावन नहीं बनती, आत्मा में तो अच्छे और बुरे संस्कार सदा ही रेकोरडिड

### तमोगुणी बनती है

रहते हैं। बुद्धि ही सतोगुणी वा तमोगुणी बनती है। जब बुद्धि सतोगुणी होती है तो यह सतोगुणी संस्कार और विचार बाहर आने देती है। जब यह तमोगुणी होती है तो तामसिक विचार और संस्कार बाहर आने देती है।

हरेक मनुष्य को यथा शक्ति बुद्धि मिली हुई है। उस बुद्धि के अनुसार ही काम करता है। जितना मनुष्य को समझ है उस से ज्यादा कुछ करना नहीं चाहता। कोई नया विचार नई बात आती है तो वह उसे स्वीकार नहीं करता। जब कभी कोई लड़ता है तो हम कहते हैं उसकी बुद्धि मारी गई है। सभी कहते हैं भगवान उसे सद्बुद्धि दो, उसे समझाओ। सद्बुद्धि के लिये यज्ञ करते हैं।

बुद्धि देश की सीमा की तरह है। देश की सीमा से पार ना किसी को जाने दिया जाता है और ना ही किसी को आने दिया जाता है। ऐसे ही व्यक्ति अपनी बुद्धि अर्थात समझ से बाहर नहीं जाता है और न ही किसी की समझ को अपनाता है।

बुद्धि धरती की आकर्षण शक्ति की तरह है। धरती किसी भी वस्तु को इसके चुम्बकीय क्षेत्र से बाहर नहीं जाने देती। जो भी अच्छी बुरी बातें मन में आ जाती हैं वह मन से निकलती नहीं।

जेल प्रशासन किसी भी कैदी को जेल से बाहर नहीं जाने देता। ऐसे ही बुद्धि मनुष्य को अपने विचारों से बाहर नहीं निकलने देती।

बुद्धि आत्मा की शक्तियों पर बेरियर है। अगर यह बेरियर हट जाये तो हम मन द्वारा देहली, अमेरिका, चीन या हिमालय पर्वत, सूक्ष्म वतन, परमधाम आदि-आदि जो देखते हैं, वह सच में ही देख सकेंगे। दुनिया के किसी भी कोने में क्या हो रहा है वह सब दिखता रहेगा

जैसे हम आस पास के लोगों को देखते हैं।

(क्रमश:)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

वर्गात गणिताचा पेपर सुरु असतो

शिक्षक - गण्या पेपर लिहायचा सोडून काय विचार करतोस.

गण्या - कुठल्या प्रश्नाचे उतर कुठल्या खिशात आहे,

याचा विचार करतोय सर.

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* देशात सर्वाधिक वाघांची संख्या कोणत्या राज्यात आहे?

- मध्यप्रदेश

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

## आहारवेद - आरोग्य संवर्धन

१४. चेहरा कांतीयुक्त करण्यासाठी व रूक्षपणा घालविण्यासाठी लोणी व मध हे मिश्रण एकत्र करून चेहऱ्याला चोळावे. त्याने चेहरा गोरा होतो.

१५. वातविकार, अर्ध्या चेहऱ्यावरून वारे जाणे, पक्षाघात या विकारांमध्ये लोणी नियमित सेवन केल्यास वरील विकार आटोक्यात येतात.

सावधानता : गाय, म्हैस व बकरी या सर्वांपासून बनविलेल्या लोण्यापैकी गायीचे लोणी उत्तम गुणधर्माचे असते. गायीच्या लोण्यापेक्षा म्हशीचे लोणी पचण्यास थोडे जड असते. त्यामुळे अति वजन असणाऱ्या रुग्णांनी म्हशीचे लोणी खाऊ नये. तसेच ताजे लोणी हे बलवर्धक, बुद्धिवर्धक असते. परंतु खूप दिवसांचे शिळे लोणी खारट, आंबट असल्याने ते रक्तपित्त प्रकोपक बनते. तसेच कफकारक, मेद वाढविणारे बनते, म्हणून शिळे लोणी खायचे टाळावे.

लोणी कढवून त्यापासून तूप तयार केले जाते. लोणी कढवताना एक विशिष्ट प्रकारचा सुगंध येतो. सुगंध तुपाचाच असतो. मराठीत 'तूप', हिंदीमध्ये

### घी

'घी', संस्कृतमध्ये 'घृत', तर इंग्रजीमध्ये 'घी' या नावाने ओळखले जाते. मनुष्याच्या सर्वांगीण विकासासाठी तूप फायदेशीर ठरते.

औषधी गुणधर्म : घृतं शीतं रसे पाके मधुरं जीवनं मतम् । स्नेहेषु चोत्तमं वृष्यं कान्तिकृत् धातुवर्धकम् ॥ कण्ठ्यं स्वयं चेन्द्रियाणां तृप्तिकृत् स्वादु तन्मतम् । वर्ण्य वयःस्थापकं च मेदकं च मृदु स्मृतम् ॥ चक्षुष्यं कफकृत् प्रोक्तमग्निदीप्तिकरं गुरू । बुद्धिमेधास्मृतिप्रज्ञातेजौजोबलपुष्टिकृत् ॥ - निघंटू रत्नाकर

आयुर्वेदानुसार : तूप हे चवीने मधुर, विपाकाने मधुर व शीत वीर्यात्मक आहे. सर्व स्नेह द्रव्यांमध्ये (तेलकट पदार्थांमध्ये) तूप हे सर्वोत्तम असून, आयुष्य वाढविणारे, सर्व धातूंची वाढ करणारे, त्वचेचा रंग उजळ करणारे व कंठाला हितकारक, स्वर चांगला करणारे, पंचेंद्रियांची तृप्ती करणारे, स्वादिष्ट, शरीरावरील जखमा भरून काढणारे, तारुण्य टिकवून ठेवणारे, भूक वाढविणारे, डोळ्यांना हितकारक, मृदू व गुरू गुणधर्माचे आहे. या गुणधर्मांमुळे त्याच्या सतत सेवनामुळे बुद्धी, स्मृती, कल्पनाशक्ती, ताकद व शुक्र या धातूंची वाढ होते. आहारामध्ये याचा उपयोग केल्याने मलावष्टंभ, रक्तपित्त, योनिरोग, नेत्र व कर्णरोग बरे होतात. तूप उत्तम त्रिदोषशामक आहे. आधुनिक शास्त्रानुसार : तुपामध्ये उष्मांक, मेद ही घटक द्रव्ये आहेत. उपयोग : सर्व तुपांमध्ये गायीचे तूप श्रेष्ठ समजले जाते. त्यामुळे आहारामध्ये गायीचे तूप सेवन केल्यास शरीराची शक्ती वाढते. मेंदू शांत राहून शरीरातील उष्णता दूर होते. भूक चांगली लागून रक्त शुद्ध राहते, म्हणून प्रत्येकाने जेवणात रोज दोन चमचे गायीचे तूप सेवन करावे.

(क्रमश:)

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**

दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर

अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# आनंदी शिक्षकच आनंदी शिक्षण देऊन आनंदी विद्यार्थी घडवू शकतो

## जयंत कुलकर्णी यांचे प्रतिपादन; हिंद सेवा मंडळाच्या शिक्षकांच्या 'आनंदायी शिक्षण' या विशेष कार्यशाळेचा समारोप



हिंद सेवा मंडळाच्या शिक्षकांच्या 'आनंदायी शिक्षण' या कार्यशाळेच्या समारोप प्रसंगी मार्गदर्शन करताना डेक्कन एज्युकेशन सोसायटी विद्यापीठाचे संचालक जयंत कुलकर्णी. समवेत कार्याध्यक्ष डॉ.रमेश झरकर, अनंत देसाई, प्रा.मकरंद खेर, मधुसूदन सारडा, जगदीश झालानी, प्राचार्य डॉ.माहेश्वरी गावित आदी.

नगर – शाळेत विद्यार्थी हे उत्सुकतेने ज्ञान ग्राहणासाठी आतुर असतात. वर्गात जाण्या आधी शिक्षकांनी आपल्या मनाची सुंदर पूर्वतयारी केली तर त्याचा आनंद वेगळाच आहे. यासाठी रोज वेळ द्या. घरचा ताणतणाव शाळेत अणु नका तर शाळेतील ताणताणाव घरी नेऊ नका. मुलांची भाषा, मुलांचे भाव, मुलांच्या नजरा, या सगळ्या आपल्याला शिक्षक म्हणून वाचता व कळल्या पाहिजे. शिक्षक म्हणून मला जर एक चांगलं व्यक्तिमत्व घडवायचं असेल तर आधी आनंदी शिक्षक व आनंदी व्यक्ती होणे आवश्यक आहे. मग हा आनंदी शिक्षक आनंदी शिक्षण देऊन आनंदी विद्यार्थी घडवू शकतो. जगाला हेवा वाटावा असा चांगला हा शिक्षक पेशा आहे, असे प्रतिपादन पुण्याच्या डेक्कन एज्युकेशन सोसायटी विद्यापीठाचे संचालक जयंत कुलकर्णी यांनी केले.

डेक्कन एज्युकेशन सोसायटी विद्यापीठाच्या सहकार्याने अहिल्यानगर मधील हिंद सेवा मंडळाच्या शिक्षकांच्या 'आनंदायी शिक्षण' या विशेष कार्यशाळेत जयंत कुलकर्णी यांनी मार्गदर्शन केले. अनंत देसाई यांच्या पुढाकारातून झालेल्या या दोन दिवसीय कार्यशाळेत डेक्कन एज्युकेशन सोसायटी विद्यापीठाच्या तज्ज्ञांनी विविध विषयांवर शिक्षकांना मार्गदर्शन केले. कार्यशाळेस हिंद सेवा मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ.रमेश झरकर, ज्येष्ठ मार्गदर्शक अजित बोरा, माजी कार्याध्यक्ष ॲड.अनंत फडणीस, संचालक सुमतीलाल कोठारी, डॉ.पारस कोठारी, प्रा.मकरंद खेर, मधुसूदन सारडा, जगदीश झालानी, प्रा.सुजित बेडेकर, सारडा महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ.माहेश्वरी गावित आदींसह सर्व शाळांचे मुख्याध्यापक व शिक्षक उपस्थित होते.

जयंत कुलकर्णी पुढे म्हणाले, विद्यार्थ्यातील कलागुण शोधा, त्यांच्या मनातील ओळखून त्यांचे जवळचे मित्र, मैत्रिणी, आई–बाबा होण्याचा प्रयत्न करा. वर्गातील तोंड पडलेल्या, कोमेजलेल्या चेहेऱ्याच्या नाराज विद्यार्थ्यांना केवळ नजरेने ओळखून त्याच्या पाठीवरती जर प्रेमाने थाप मारली तर मुलं फुलासारखी उमलून येतात. विद्यार्थ्याला शिक्षकाचं माझ्याकडे लक्ष असून त्यांच्या कोशामध्ये मला काहीतरी स्थान आहे, एवढं कळल तरी त्यांच्या मनात शिक्षकाप्रती जागा निर्माण होते.

कार्याध्यक्ष डॉ.रमेश झरकर म्हणाले, आनंदायी पद्धतीने शिक्षण देणे खूप आवश्यक आहे. डेक्कन एज्युकेशन सोसायटी सारख्या नावाजलेल्या व प्रतिष्ठित संस्थेने आमच्या संस्थेतील शिक्षकांना प्रशिक्षित केल्याने या कार्यशाळेचे नक्कीच चांगले फलित होईल व आदर्श विद्यार्थी घडतील.

कार्यशाळेचे संयोजक अनंत देसाई म्हणाले, शिक्षण क्षेत्रात आता खूप बदल होत आहेत. काळानुरूप पुढे जाण्यासाठी हिंद सेवा मंडळाच्या शिक्षकांना अधिक उत्तम प्रकारे ज्ञानदान करता यावे यासाठी डेक्कन एज्युकेशन सोसायटीने पुढाकार घेत आपल्याबरोबर आली आहे. या माध्यमातून नक्कीच रचनात्मक कामे उभी राहून सकारात्मक परिणाम होणार आहे.

यासाठी पुण्याचे उद्योजक प्रमोद चौधरी, हिंद सेवा मंडळाचे अध्यक्ष प्रा.शिरीष मोडक, सचिव संजय जोशी, ज्येष्ठ मार्गदर्शक ब्रीजलाल सारडा यांच्यासह सर्व पदाधिकाऱ्यांनी सहकार्य व मार्गदर्शन लाभले आहे.

कार्यशाळेत प्रशिक्षण देणाऱ्या डेक्कन एज्युकेशनच्या तज्ज्ञांचा सन्मान समारोप प्रसंगी करण्यात आला. यावेळी सारडा महाविद्यालयाचे प्रबंधक अशोक असेरी, उपप्राचार्य गिरीश पाखरे, मुख्याध्यापक विठ्ठल उरमुडे आदी उपस्थित होते.

# प्रेरणादायी अक्षरधन

## वैश्विक मानवतावाद

"मुसाफिर"
संकलन: दिशान फिचर्स

समाज मनाला सुखावणारी
चैतन्य पालवी
डॉ. रामचंद्र देखणे
'चपराक' प्रकाशित ललित चिंतन

साम्यभावाला गेलेल्या भक्ताची किंवा सत्पुरुषाची भूमिका मांडताना ज्ञानदेवांनी फार सुंदर दृष्टांत दिले आहेत.

कां घरिचिया उजियेडु करावा ।<br>
पारखिया आंधार पाडावा।<br>
हे नेणेचि गा पांडवा।<br>
दीपु जैसा ।।<br>
जो खांडावया घाव घाली ।<br>
का लावणी जयाने केली।<br>
दोघा एकचि साऊली।<br>
वृक्षु दे जैसा।।<br>
ना तरी इक्षुदंडु।<br>
पाळितया गोडु ।<br>
गाळीतया कडु।<br>
नोहेचि जेवी ।।

ज्याच्या ठिकाणी भेदभावाची वार्ताच नसल्यामुळे तो हा शत्रू आहे तर हा मित्र असा भेदभाव न पाहता दोघांनाही सारख्याच योग्यतेचे समजतो. जसे घरातील माणसांना उजेड करावा आणि बाहेरच्यांना मात्र अंधार पाडावा असा भेद दिवा जसा जाणत नाही, जो झाडावर कुऱ्हाडींचे घाव घालतो त्यालाही आणि ज्याने झाड लावून पाणी घालून वाढविले त्या दोघांनाही झाड सारखीच सावली देते.

पाणी घालणाऱ्याला दाट सावली द्यावी आणि फांद्या तोडणाऱ्यांना, कुऱ्हाडीचे घाव घालणाऱ्यांना सावली काढून घ्यावी अशी भूमिका वृक्ष कधीच घेत नाही. ऊस हा पाणी देऊन जोपासणाऱ्याला गोड आणि चरकात घालून गाळणाऱ्याला कडू होत नाही. त्याची सारखीच गोडी दोघांनाही चाखता येते. चांदणे हे आल्हादपणाच्या बाबतीत राजा आणि भिकारी दोघांनाही सारखेच असते. जो लोकांच्या निंदेलाही स्वीकारीत नाही आणि स्तुतीने गर्व करीत नाही. आकाशाला जसा लेप लावता येत नाही तसा तो निर्लेप जीवन जगत असतो.

पै आघवेचि आपुलेपणे।<br>
नुरेचि जया अभिलाषणे ।<br>
जैसे येथूनि पहा जाणे।<br>
आकाशा नाही।

आकाशाला जसे आज या गावाहून दुसऱ्या गावाला जाणे नसते त्याप्रमाणेच 'आघवेचि आपुलेपणे' ही भूमिका घेऊन तो अभिलाषेच्या पलीकडे गेलेला असतो. सर्वाठायी, समत्व, अभेदत्व आणि असंगत्व पावलेला असा तो खऱ्या अर्थाने साम्यभावातून ब्रह्मभावालाच जागवीत असतो. हा ब्रह्मभाव आणि साम्यभाव जनविश्वात ओतप्रोत भरावा म्हणून एकीकडे अद्वैतभक्तिचे मर्म सांगून मानवतेचा धर्मच ते उभा करतात. वैश्विक मानवतावाद हाच ज्ञानदेवांच्या विचारतत्त्वाचा गाभा आहे.

– किशोर गांधी

# गोरक्षनाथ देवस्थान मंदिराच्या कलशरोहणनिमित्त स्मरणिकेची निर्मिती; भाविकांनी आपले अनुभव व छायाचित्रे द्यावीत : देवस्थान ट्रस्टचे आवाहन



नगर – आदर्श गाव म्हणून ओळखले जाणारे मांजरसुंबा येथील श्री क्षेत्र गोरक्षनाथ देवस्थान गड येथे मंदिराच्या कलशरोहण व लोकार्पण सोहळ्याचे आयोजन ७ मार्च रोजी उत्साहात करण्यात आले आहे. या पवित्र प्रसंगानिमित्त देवस्थानतर्फे विशेष स्मरणिका (पुस्तिका) प्रकाशित करण्याचे निश्चित करण्यात आले असून, त्यासाठी भाविकांकडून लेखन व छायाचित्रे मागविण्यात येत आहेत. मंदिराच्या जुर्णोद्धारात आर्थिक, श्रम, किंवा मनोबलाच्या माध्यमातून ज्यांनी सहकार्य केले आहे, त्या सर्व भक्तांनी आपल्या अनुभवांविषयी, श्रद्धेच्या आठवणींबाबत अथवा या कार्याशी जोडलेला वैयक्तिक सहभागाबाबत माहिती निर्भयपणे लिहून द्यावी. आपल्या लेखनासोबत दोन पासपोर्ट आकाराचे फोटो जोडावेत.

ही माहिती व छायाचित्रे १५ फेब्रुवारी पर्यंत देवस्थानचे व्यवस्थापक विलास भुतकर यांच्याकडे सुपूर्द करावीत.

श्री क्षेत्र गोरक्षनाथ गडाच्या पुनर्बांधणीसाठी अनेक भक्तांनी मोठ्या श्रद्धेने सहकार्य केले आहे. त्या सर्व भाविकांच्या योगदानाचा गौरव व या ऐतिहासिक कार्याची नोंद भाविकांच्या आठवणीत राहावी म्हणून ही स्मरणिका प्रकाशित करण्यात येत आहे. हा सोहळा भक्ती, श्रद्धा आणि संतपरंपरेचा साक्षीदार ठरणार आहे. श्री क्षेत्र गोरक्षनाथ देवस्थानाच्या कलशरोहण सोहळा हा आपल्या सर्व भक्तांसाठी अभिमानाचा क्षण आहे. ज्यांनी या देवकार्याला हातभार लावला, त्यांचे अनुभव स्मरणिकेत जतन करणे हे आमचे कर्तव्य आहे. भाविकांनी आपले अनुभव व फोटो वेळेत सादर करून या ऐतिहासिक क्षणाचा भाग व्हावे आणि सोहळा यशस्वी होण्यासाठी सहकार्य करावे. असे आवाहन देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष शंकरराव कदम यांनी केले.



अपंग संजीवनी सोसायटीच्या मूकबधिर विद्यालयात दिव्यांग विद्यार्थ्यांना सेल्फ–डिफेन्स प्रशिक्षण देण्यात आले. यावेळी विद्यालयाचे चेअरमन मधुकर भावले, ज्येष्ठ संचालिका विद्या भावले, राहुल भावले, मुख्याध्यापक डी. के. जगधने, अकॅडमीच्या संस्थापक वर्षा पडवळ, निलेश रेणुसे, मुख्य प्रशिक्षक सायली भणगे, सिद्धा रेणुसे, युवराज लंकेश्वर यांच्यासह शिक्षकवृंद व विद्यार्थी उपस्थित होते. (छाया – समीर मन्यार)

# आत्मविश्वास हीच खरी सुरक्षितता : दीक्षा अग्रवाल/भावले

## मूकबधिर विद्यालयात दिव्यांग विद्यार्थ्यांना सेल्फ–डिफेन्सचे प्रशिक्षण

नगर – दिव्यांग मुलांसाठी सेल्फ–डिफेन्स म्हणजे केवळ शारीरिक तंत्र नव्हे, तर आत्मविश्वास, स्वतःची सुरक्षितता आणि परिस्थितीची अचूक ओळख निर्माण करणारे प्रभावी शस्त्र आहे, असे प्रतिपादन ज़ेवाना कंपनीच्या संस्थापक व मुख्य कार्यकारी अधिकारी सुश्री दीक्षा अग्रवाल/भावले यांनी केले.

कमिन्स इंडिया फाउंडेशनच्या वतीने प्रो क्शन सेल्फ डिफेन्स अकॅडमी, पुणे यांच्या सहकार्याने सावेडी येथील अपंग संजीवनी सोसायटीच्या मूकबधिर विद्यालयातील दिव्यांग विद्यार्थी व विद्यार्थिनींसाठी ८ दिवसीय सेल्फ–डिफेन्स प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या प्रशिक्षणामुळे विद्यार्थ्यांमध्ये निर्भयता, सजगता व स्वसंरक्षणाची जाणीव निर्माण झाली.

या वेळी विद्यालयाचे चेअरमन मधुकर भावले, ज्येष्ठ संचालिका विद्या भावले, राहुल भावले, मुख्याध्यापक डी. के. जगधने, अकॅडमीच्या संस्थापक वर्षा पडवळ, निलेश रेणुसे, मुख्य प्रशिक्षक सायली भणगे, सिद्धा रेणुसे, युवराज लंकेश्वर यांच्यासह शिक्षकवृंद व विद्यार्थी उपस्थित होते. प्रशिक्षणात विद्यार्थ्यांना आजूबाजूच्या वातावरणाबाबत सतर्क राहणे, ऐकण्याऐवजी दृष्टी, स्पर्श, शरीर हालचाल व व्हायब्रेशन या सेन्सेसचा प्रभावी वापर, संशयास्पद हालचाली व चुकीचा स्पर्श ओळखणे, धोका टाळण्यासाठी योग्य निर्णय घेणे, तसेच साइन लँग्वेज, हातवारे, मोबाईल व लिखित संदेशांद्वारे मदत मागण्याचे प्रात्यक्षिक देण्यात आले.

परिस्थिती जागरूकता विकसित करून स्वतःचे संरक्षण कसे करावे याचे सखोल मार्गदर्शन करून प्रशिक्षण देण्यात आले असल्याचे ज्येष्ठ संचालिका विद्या भावले यांनी सांगितले. या उपक्रमामुळे दिव्यांग विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढून त्यांना दैनंदिन जीवनात सुरक्षिततेची नवी ताकद मिळाल्याचे उपस्थितांनी नमूद केले.

# अध्यात्म आणि विज्ञान यांची सांगड घालणारी संतांची परंपरा पुढच्या पिढीपर्यंत जावी

## आ. संग्राम जगताप यांचे प्रतिपादन; लाड सुवर्णकार समाजाच्या वतीने संत शिरोमणी नरहरी महाराज पुण्यतिथी सप्ताह



संत शिरोमणी नरहरी महाराज यांच्या ७४० व्या पुण्यतिथीनिमित्त लाड सुवर्णकार समाजाच्या वतीने अहिल्यानगर कोर्ट गल्ली येथील विठ्ठल रुक्मिणी मंदिरात आयोजित अखंड हरिनाम सप्ताहाच्या समारोपप्रसंगी बोलताना आमदार संग्राम जगताप. समवेत ह. भ. प. जनार्दन महाराज माळवदे समाजाचे अध्यक्ष संजय देवळालीकर व उपस्थित समाजबांधव.

नगर – भारतीय संस्कृतीमध्ये तत्कालीन परिस्थितीत अध्यात्म आणि विज्ञान यांची सांगड घालत समाजामध्ये जागरूकता आणण्याचे काम संतांनी केले. माहिती तंत्रज्ञानाच्या युगात भारत महासत्तेकडे जात असताना आपली भारतीय संस्कृती, परंपरा, संतांचे विचार पुढच्या पुढच्या पिढीपर्यंत घेऊन जाणे ही आजच्या काळाची गरज आहे. महान विठ्ठल भक्तीचे पाईक असणारे संत शिरोमणी नरहरी महाराज आणि त्यांची शिकवण आज या सप्ताहाच्या निमित्ताने पुढच्या पिढीपर्यंत जात आहे. संत विचारांची परंपरा पुढे घेऊन जाण्यासाठी असे कार्यक्रम प्रेरक असल्याचे प्रतिपादन आमदार संग्राम जगताप यांनी केले.

श्री संत शिरोमणी नरहरी महाराज यांच्या ७४० व्या पुण्यतिथीनिमित्त लाड सुवर्णकार समाज विश्वस्त संस्था व युवक मंडळाच्या वतीने कोर्ट गल्ली येथील विठ्ठल रुक्मिणी मंदिरात आयोजित सप्ताहाच्या समारोपसंगी आमदार जगताप बोलत होते. याप्रसंगी ह भ प जनार्दन महाराज माळवदे यांचे काल्याचे किर्तन झाले. या कार्यक्रमास मा. उपनगराध्यक्ष किशोर भोसले, नगरसेवक प्रकाश भागानगरे, संजय चोपडा, पै.मनोज सुभाष लोंढे, संतोष ग्यानप्पा, नगरसेवक गणेश कवडे, सौ. आशा किशोर डागवाले, समाजाचे अध्यक्ष संजय देवळालीकर आदीसह समाज बांधव उपस्थित होते.

या प्रसंगी आमदार संग्राम जगताप यांचा ह. भ. प. माळवदे महाराज यांनी सत्कार केला. नवनिर्वाचित नगरसेवक यांच्या सन्मान संजय देवलालीकर यांनी केला. नगरसेविका सौ.आशा डागवले यांचा सन्मान सौ. कांचन निफाडकर यांनी केला. यावेळी सप्ताह निमित्त आयोजित महाप्रसादासाठी रामु विनायक नांदुरकर तसेच महिला भजनी मंडळ समन्वयक सौ. सुनीता कुलट व शहरकर परिवार यांचे सहकार्य लाभले. गेली ७ दिवस चाललेल्या या पुण्यतिथी सोहळ्यासाठी लाड सुवर्णकार विश्वस्त मंडळ, युवक संघटना, समाज बांधव तसेच विश्वस्त मंडळाचे सदस्य संजय देवळालीकर, मुकुंद निफाडकर, शरद कुलथे, सचिन देवळालीकर, प्रकाश देवळालीकर, जगदीश देडगावकर, श्याम मुंडलिक, विनोद कुलथे, योगेश नागरे, गणेश डहाळे, सुरेश मैड आदींचे सहकार्य लाभले.

# श्री मार्कंडेय मंदिरात ८ फेब्रुवारी रोजी गजानन महाराज प्रकट दिन कार्यक्रम



नगर – सद्गुरू श्री गजानन महाराज प्रकट दिन ८ फेब्रुवारी रोजी येत असून या दिवशी सालाबाद प्रमाणे श्री मार्कंडेय मंदिर देवस्थान, गांधी मैदान, अहिल्यानगर येथे श्री सद्गुरू गजानन महाराज प्रकट दिन सोहळा साजरा करण्यात येणार असल्याची माहिती देवस्थानचे उपाध्यक्ष त्रिलेश येनगंदुल यांनी दिली.

प्रकट दिनी सकाळी श्रींचा अभिषेक व आरती तसेच प्रसाद वाटप, सायंकाळी ५ वाजता श्री अंबिका महिला भजनी मंडळाचा भजनांचा कार्यक्रम, सायंकाळी ७ वाजता श्री सद्गुरू गजानन महाराजांची महाआरती व संध्या.७.३० वाजता महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. संध्या. ७.३० ते रात्री ९ वाजता भजन संध्या. याप्रमाणे प्रकट दिनाच्या दिवशी कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत, तरी सर्व भक्तांनी या सर्व कार्यक्रमांमध्ये सहभागी होऊन श्री सद्गुरूंचे दर्शनाचा व महाप्रसादाचा लाभ घेऊन कार्यक्रमाची शोभा वाढवावी.

तसेच महाप्रसादासाठी ज्या भक्तांना शिधा स्वरूपात किंवा रोख देणगी द्यावयाची असेल त्यांनी पुढील मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा ९८ ९० १०० ८७९, किंवा ९८ ६० ३४ ५६ ५९ या नंबर वर संपर्क करावा, असे देवस्थान कमिटीकडून आवाहन करण्यात येत आहे.

### महात्मा फुले एज्युकेशन सोसायटीच्या

# केशवराव गाडीलकर हायस्कूलला एन्पॉवरकडून दहा लॅपटॉप्सची भेट

नगर – सावेडी येथील महात्मा फुले एज्युकेशन सोसायटी संचलित केशवराव गाडीलकर हायस्कूलला एन्पॉवर कंपनीचे प्रोजेक्ट मॅनेजर प्रशांत गायकवाड यांच्या हस्ते दहा लॅपटॉप सप्रेम भेट देण्यात आले. या उपक्रमामुळे गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना आधुनिक शिक्षणाची संधी उपलब्ध होणार आहे.

या लॅपटॉप्सच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना संगणकीय ज्ञान देणे, तंत्रज्ञानाशी परिचित करणे तसेच त्यांचे ज्ञान अद्यावत ठेवणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. लॅपटॉप्स प्रत्यक्ष पाहून विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद दिसून आला.

या प्रसंगी विद्यालयाचे मुख्याध्यापक अनिल गायकवाड यांनी एन्पॉवर कंपनीचे प्रशांत गायकवाड यांचे आभार मानले. तसेच संस्थेचे सचिव नामदेवराव गाडीलकर यांनी या सामाजिक उपक्रमाबद्दल कौतुक व समाधान व्यक्त करत सर्वांचे आभार मानले.

हा उपक्रम विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीस निश्चितच उपयुक्त ठरणार असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

याप्रसंगी प्राथमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका मनीषा बोर्डे, शिंदे बी बी आणि सर्व शिक्षक वृंद उपस्थित होते.



महात्मा फुले एज्युकेशन सोसायटीच्या केशवराव गाडीलकर हायस्कूलला एन्पॉवरकडून दहा लॅपटॉप्सची भेट देण्यात आली.





हिंद सेवा मंडळाच्या प्राथमिक शाळेत विद्यार्थ्यांसाठी लक्ष्मीनारायण सत्संग मंडळाच्या वतीने भक्ती गीतांसोबतच देशभक्तीपर गीतांचा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विद्यार्थ्यांनी हुरडा, हरभरा, कणसं यांचा आस्वाद घेवून शेकोटीचा आनंद घेतला.

# हिंद सेवा मंडळाच्या विद्यार्थ्यांनी घेतला हुरडा, हरभरा, कणसं यांचा मनमुराद आस्वाद व शेकोटीचा आनंद

## लक्ष्मीनारायण सत्संग मंडळाचा देशभक्तीपर गीतांचा कार्यक्रम रंगला

नगर – हिंद सेवा मंडळाच्या प्राथमिक शाळेत विद्यार्थ्यांसाठी लक्ष्मीनारायण सत्संग मंडळाच्या वतीने भक्ती गीतांसोबतच देशभक्तीपर गीतांचा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. देवा हो देवा गणपती देवा तुमसे बढकर कौन, सत्यम शिवम सुंदरम, ए मेरे प्यारे वतन तुझं पे दिलं कुर्बान, प्रित जहाँ की रीत सदा मैं गीत वहा के गाता हुं भारत का रहनेवाला हुं भारत के गीत गाता हु, जहा डाल डाल पर सोनेकी चिडीया करती है बसेरा वो भारत देश है मेरा, कर चले हम फिदा जान और तन साथीयो अब तुम्हारे हवाले वतन साथीयो, देदी तुने आजादी बिना खडग बिना ढाल साबरमती के संत तुने कर दिया कमाल. ही देशभक्तीपर गीते सादर करण्यात आली.

यानंतर शेकोटी चे पूजन हिंद सेवा मंडळाच्या प्राथमिक शाळेचे चेअरमन मधुसूदन सारडा व सौ.स्मिता सारडा यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी दादा चौधरी विद्यालयाचे चेअरमन अनंत देसाई, लक्ष्मीनारायण सत्संग मंडळाचे अविनाश बिहानी, राजेश झंवर, ओमप्रकाश मुंदडा, दिपक काबरा, लक्ष्मीनिवास सारडा, संजय सारडा, सचिन क्षिरसागर, दिलीप चंगेडिया, अनिल झंवर, शैला सारडा, विनिता सारडा, सौ.चंगेडिया, शाळेचे मुख्याध्यापक विठ्ठल उरमुडे आदींसह शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी व पालक उपस्थित होते.

शेकोटी पेटल्यानंतर विद्यार्थ्यांनी सुरती हुरडा व मक्याची कणसे व ओला हरभरा यांचा मनमुराद आस्वाद घेतला. दरवर्षी विद्यार्थ्यांसाठी विविध उपक्रम घेण्यात येतात. विद्यार्थ्यांना ग्रामीण भागातील शेकोटीचा आनंद मिळावा. यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते, असे मुख्याध्यापक विठ्ठल उरमुडे यांनी सांगितले.

# विद्यार्थ्यांनी मोठी स्वप्ने पाहून ती पूर्ण करण्यासाठी कठोर मेहनत करावी

## ब्रिगेडियर पी. सुनीलकुमार



अहिल्यानगर छावणी परिषदेच्या नव्या अद्ययावत संगणक प्रयोगशाळेचे उद्घाटन करताना परिषदेचे अध्यक्ष ब्रिगेडियर पी. सुनीलकुमार. समवेत मुख्यकार्यकारी अधिकारी पल्लवी विजयवंशी, मनोनीत सदस्य वसंत राठोड, मुख्याध्यापक संजय शिंदे व नीता राठोड आदी.

### छावणी परिषदेच्या शाळेच्या अद्ययावत संगणक प्रयोगशाळेचे उद्घाटन

नगर – विद्यार्थ्यांनी आदर्श व यशस्वी नागरिक होण्यासाठी जीवनात मोठी स्वप्ने पाहावीत. ती पूर्ण करण्यासाठी कठोर मेहनत, सातत्यपूर्ण अभ्यास आणि प्रामाणिकपणा या तीन गोष्टी अंगीकाराव्यात, असे आवाहन अहिल्यानगर छावणी परिषदेचे अध्यक्ष ब्रिगेडियर पी. सुनीलकुमार यांनी करून नगरच्या छावणी परिषदेच्या शाळेला संरक्षण खात्याचा राष्ट्रीय स्तरावरील आदर्श शाळा पुरस्कार मिळाल्याबद्दल शाळेचे कौतुक केले. हा पुरस्कार मिळणे ही अत्यंत अभिमानाची बाब असून शाळा सर्व क्षेत्रांत चौफेर प्रगती करत असल्याचे दिसून येते, असे गौरवोद्गार त्यांनी काढले. तसेच शाळेच्या वाचनालयासाठी भरपूर पुस्तके भेट देऊन विद्यार्थ्यांना खाऊ देऊन त्यांचे कौतुक केले.

अहिल्यानगर छावणी परिषदेच्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर शाळेस पीएमश्री योजनेतून मिळालेल्या नव्या अद्ययावत संगणक प्रयोगशाळेचे उद्घाटन प्रसंगी ब्रिगेडियर पी. सुनीलकुमार बोलत होते. या कार्यक्रमास भिंगार छावणी परिषदेच्या मुख्यकार्यकारी अधिकारी पल्लवी विजयवंशी, छावणी परिषदेचे मनोनीत सदस्य वसंत राठोड, नीता राठोड आदी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. यावेळी छावणी परिषदेच्या प्राथमिक व माध्यमिक शाळांच्या वार्षिक स्नेहसंमेलनाचे उद्घाटनही ब्रिगेडियर पी.सुनीलकुमार यांच्या हस्ते झाले. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक संजय शिंदे, राजू भोसले, मुबीना सय्यद आदींसह सर्व शिक्षक, विद्यार्थी व पालक उपस्थित होते. स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांना पाहुण्यांच्या हस्ते पारितोषिके देण्यात आली.

पल्लवी विजयवंशी म्हणाल्या, यावर्षी संरक्षण खात्याचा आदर्श शाळा पुरस्कार आपल्या शाळेस मिळाल्याने या वर्षीचे स्नेहसंमेलन हे विशेष आहे. देशातील ६१ शाळांमध्ये हा मानाचा पुरस्कार मिळणे हे खूप मोठे यश आहे. हे मुख्याध्यापक व शिक्षकांचे योगदान आहे. विद्यार्थ्यांनी शिस्त, कुतूहल व निडरता या तीन सिद्धांतानुसार काम केल्यास नक्कीच जीवनात यशस्वी व्हाल, असा संदेश त्यांनी दिला.

प्रास्ताविकात मुख्याध्यापक संजय शिंदे यांनी शाळेचा वार्षिक अहवाल सादर करून विविध स्पर्धांत विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या यशाची माहिती दिली.

मनोनीत सदस्य वसंत राठोड यांनी आभार मानून शाळेस राष्ट्रीय स्तरावरील आदर्श पुरस्कार मिळाल्याबद्दल सर्वांचे कौतुक केले.

स्नेहसंमेलनात झालेल्या सांस्कृतिक कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी भारतीय परंपरेचे दर्शन घडवत विविध नृत्याविष्कार व नाटक सादर करून उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन संध्या पाटकुलकर व महेश भगत यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी संजय हजारे, अरविंद कुडीया, सुभाष भारूड, सीमा चोभे, स्नेहल लवांडे, गुलमोहंमद शेख, सगीर शेख, महेश मोहिते, सोन्याबापू लबडे, लता पाटील, सोनाली झिरपे, काळू हिले, प्रशांत आठवाल आदींनी परिश्रम घेतले.



ज्ञानसंपदा शाळेत आंतरशालेय अॅथलेटिक्स स्पर्धेचे बक्षीसवितरणप्रसंगी शाळेच्या मुख्याध्यापिका शिवांजली अकोलकर, हार्मोनी इंटरनॅशनल स्कूलचे क्रीडाशिक्षक चंद्रशेखर चव्हाण, ब्लू डायमंड इंग्लिश मीडियम स्कूलच्या क्रीडाशिक्षिका बोराडे, थोरात, आंबेडकर, स्कूलचे क्रीडा शिक्षक गोरक्ष धात्रक, विकास परदेशी, मच्छिंद्र साळुंके, शिक्षक व विद्यार्थी. (छाया – उदय जोशी)

# ज्ञानसंपदा शाळेत आंतरशालेय अॅथलेटिक्स स्पर्धेत, विविध शाळांमधील सुमारे १०० खेळाडूंचा सहभाग

नगर – तपोवन रोड येथील ज्ञानसंपदा स्कूलमध्ये विद्यार्थ्यांमध्ये क्रीडाविषयक आवड निर्माण व्हावी तसेच खिलाडूवृत्ती, शिस्त व मैत्रीची भावना वाढीस लागावी या उद्देशाने दरवर्षीप्रमाणे आंतरशालेय अॅथलेटिक्स स्पर्धेचे यशस्वी आयोजन करण्यात आले.

या स्पर्धेत विविध शाळांमधील सुमारे १०० खेळाडूंनी सहभाग नोंदवला. स्पर्धेचे उद्घाटन हार्मोनी इंटरनॅशनल स्कूलचे क्रीडाशिक्षक चंद्रशेखर चव्हाण, ब्लू डायमंड इंग्लिश मीडियम स्कूलच्या क्रीडाशिक्षिका बोराडे, थोरात व आंबेडकर यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती शिवांजली अकोलकर उपस्थित होत्या.

स्पर्धेत लांब उडी, गोळाफेक, भालाफेक व थाळीफेक या क्रीडाप्रकारांचा समावेश होता. विद्यार्थ्यांनी प्रत्येक स्पर्धेत चुरशीची लढत देत उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले. या स्पर्धेत एकूण १४ खेळाडूंना सुवर्ण, रौप्य व कांस्य पदकांनी सन्मानित करण्यात आले. विजेत्यांना पदके, प्रमाणपत्रे व चषक प्रदान करण्यात आले. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी ज्ञानसंपदा स्कूलचे क्रीडा शिक्षक गोरक्ष धात्रक, विकास परदेशी, मच्छिंद्र साळुंके, शिक्षकवृंद व विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

# योगासन स्पर्धेत श्रमिक कॉलेजच्या प्रा. सुरेखा भवर महाराष्ट्रात 'प्रथम'



नगर – शरीर, मन आणि बुद्धी यांचा अद्वैत समन्वय साधणाऱ्या योगासनाच्या राज्यस्तरीय स्पर्धेत संगमनेरच्या प्रा.सुरेखा ठकाजी भवर यांनी देदीप्यमान कामगिरीने प्रथम क्रमांक मिळवले. महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण व क्रीडा विभाग आणि महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन प्रशिक्षण संस्था, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित नांदेड येथे झालेल्या राज्यस्तरीय शिक्षक–अधिकारी योगासन स्पर्धेत त्यांनी सर्वाधिक १०६.८ गुणासह महाराष्ट्रात अव्वल स्थान पटकावले.

शिक्षण प्रसारक संस्थेच्या श्रमिक ज्युनिअर कॉलेजमध्ये त्या इंग्रजी विषयाच्या प्राध्यापिका म्हणून कार्यरत आहेत.

त्यांनी प्रथम संगमनेर तालुकास्तरावर, नंतर पुणे विभागीय स्तरावर आणि नांदेड येथील राज्यस्तरावर प्रथम असे तिन्ही टप्प्यांमध्ये प्रथम क्रमांक मिळवला आहे. चुरशीच्या लढतीत त्यांनी अचूकता, संतुलन आणि सहज सुंदर आसनांच्या उत्तम सादरीकरणाद्वारे परीक्षकांचे मन प्रभावित केले.

या यशाचे शिक्षण प्रसारक संस्थेचे कार्याध्यक्ष, आशियाई योगासन महासंघाचे अध्यक्ष तथा 'भारत योगासन'चे उपाध्यक्ष डॉ. संजय मालपाणी यांनी त्यांचे कौतुक केले. याप्रसंगी संस्थेचे सचिव डॉ. अनिल राठी, खजिनदार राजकुमार गांधी, जनरल सेक्रेटरी सीए नारायण कलंत्री, प्राचार्य डॉ.अरुण गायकवाड, उपप्राचार्य डॉ. राजेंद्र ढमक, पर्यवेक्षक प्रा. आप्पासाहेब गुंजाळ यांनी त्यांचे अभिनंदन केले. तसेच, संगमनेर पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी बाळासाहेब गुंड, गटविकास अधिकारी प्रवीण सिनारे, DIET अहिल्यानगरचे प्राचार्य डॉ.राजेश बनकर, वरिष्ठ अधिव्याख्याता अरुण भांगरे यांनी अभिनंदन केले आहे.

# राज्य बालनाट्य स्पर्धेत नगरचे 'मुंग्यांची दुनिया' नाशिक केंद्रात प्रथम

### बालनाट्याने या स्पर्धेत दिग्दर्शन प्रथम तेजा पाठक



नगर – महाराष्ट्र शासनच्या सांस्कृतिक विभागाने घेतलेल्या २२ व्या राज्य बालनाट्य स्पर्धेच्या प्राथमिक फेरीचा निकाल जाहीर झाला आहे. यामध्ये नाशिक केंद्रावर सादर झालेल्या ६० एकांकिकांमध्ये अहिल्यानगरच्या नाट्य आराधना संस्थेच्या 'मुंग्यांची दुनिया' या बालनाट्याने सांघिक प्रथम क्रमांक पटकावत जवळपास सर्वच प्रमुख पारितोषिके मिळवली आहे. ज्येष्ठ रंगकर्मी अनंत जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली सादर झालेल्या या बालनाट्याने या स्पर्धेत दिग्दर्शन प्रथम तेजा पाठक, प्रकाश योजना प्रथम गणेश लिमकर, नेपथ्य प्रथम समीर पाठक व वेशभूषा प्रथम तेजा पाठक आदी पारितोषिके मिळवत हे बालनाट्य केंद्रात अव्वल ठरले आहे. या नाटकाची आता अंतिम फेरीसाठी निवड झाली आहे.



राज्य बालनाट्य स्पर्धेत अहिल्यानगरच्या नाट्य आराधनाचे 'मुंग्यांची दुनिया' हे बालनाट्य नाशिक केंद्रात प्रथम आल्यावर नाटकातील सर्व बालकलाकारांनी व पदाधिकाऱ्यांनी जल्लोष केला. यावेळी नाट्य आराधनाचे अनंत जोशी, दिग्दर्शक तेजा पाठक, समीर पाठक, गणेश लिमकर, तेजस अतीतकर आदींसह बालकलाकार.

या यशाबद्दल नाटकातील सर्व बालकलाकारांनी, नाट्य आराधनाच्या पदाधिकाऱ्यांनी व पालकांनी सावेडी मधील जिल्हा वाचनालयाच्या सभागृहात जल्लोष करून या निकालाचे स्वागत केले. यावेळी सर्वांच्या चेहऱ्यावर गुलाल लावून तसेच पेढे व चॉकलेट्स वाटण्यात आले. राणी मुंगीचा विजय असो... मुंग्याचे राज्य चिरायू होवो... या नाटकातील डायलॉगच्या घोषणा देत बालकलाकारांनी जल्लोष केला. यावेळी तेजस अतितकर, रुद्र रसाळ, महादेव गाडे, राहुल रासकर, आबा सैदाणे, रघुनाथ सातपुते, देवदत्त चौसळकर आदी उपस्थित होते.

या स्पर्धेत नगरच्या होप फौंडेशन यांच्या ठोंब्या ठोंबीची गोष्ट या बालनाट्याला वेशभूषा तृतीय – शीतल देशमुख, साईनाथ सरडे याला 'निरोप घेताना' या अथर्व धर्माधिकारी दिग्दर्शित नाटकासाठी गुणवत्ता प्रमाणपत्र ही पारितोषिके मिळाली आहेत. यावेळी अनंत जोशी म्हणाले, २०२० सालीही नाट्य आराधनाच्या वानारायण या बाल नाट्याने राज्य नाट्य स्पर्धेत प्रथम येत अनेक पारितोषिके मिळवले होते. नगरमध्ये सांस्कृतिक क्षेत्रासाठी पोषक वातावरण आहे. नव्या पिढीतील कलाकारांना घडवण्यासाठी नाट्य आराधना संस्था काम करत आहे. मिळालेले यश संस्थेच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी व सर्व बाल कलाकारांनी घेतलेल्या मेहनतीचेच फळ आहे.

# आरोग्य म्हणजे संपत्ती : पंडितराव गुरूजी

### जपानी तंत्रज्ञानाच्या अत्याधुनिक मशिनरीद्वारे संपूर्ण शरीर तपासणी, मोफत सर्व रोगनिदान शिबिराला प्रतिसाद



नगर–कल्याण रोड परिसरात पार्वतीबाई सुखदेव वेताळ सामाजिक विकास संस्था, आधार शक्ती बचत गट, सेफ टी इंडस्ट्रीज व माय लाईफस्टाईल मार्केटिंग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या मोफत सर्व रोगनिदान शिबिराला नागरिकांचा प्रतिसाद लाभला.

नगर – आरोग्य म्हणजे खरी संपत्ती आहे. मात्र, आजच्या धकाधकीच्या जीवनशैलीमुळे अनेक जण स्वतःच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करत आहेत. परिणामी हृदयरोग, मधुमेह, उच्च रक्तदाब, मानसिक ताणतणाव यांसारख्या आजारांचे प्रमाण वाढत आहे. अशा परिस्थितीत मोफत सर्व रोगनिदान शिबिरे ही समाजासाठी मोठा आधार ठरत आहेत. वेळेवर आजाराचे निदान झाल्यास गंभीर आजारही सहज टाळता येतात, असे उद्घाटनप्रसंगी पंडितराव गुरूजी यांनी सांगितले.

शहराच्या नगर–कल्याण रोड परिसरात पार्वतीबाई सुखदेव वेताळ सामाजिक विकास संस्था, आधार शक्ती बचत गट, सेफ टी इंडस्ट्रीज व माय लाईफस्टाईल मार्केटिंग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या मोफत सर्व रोगनिदान शिबिराला नागरिकांचा प्रतिसाद लाभला. आधुनिक वैद्यकीय सुविधांचा लाभ सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या शिबिरात जपानी तंत्रज्ञानाच्या अत्याधुनिक मशिनरीच्या साहाय्याने संपूर्ण शरीराची तपासणी करण्यात आली.

नगर–कल्याण रोडवरील फॅमिली विश्व मॉल येथे भरलेल्या या शिबिराचे उद्घाटन पंडितराव गुरूजी यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सेफ टी इंडस्ट्रीजचे चेअरमन परशुराम कोतकर होते. यावेळी पार्वतीबाई सुखदेव वेताळ सामाजिक विकास संस्थेचे अध्यक्ष मेजर शिवाजी वेताळ, प्रा. भगवान काटे, राजाराम रोहकले, मेजर पर्वतराव हराळ, अनिता शिवाजी वेताळ, आंधळे सर यांच्यासह सुधाकर सिनारे, विशाल गायकवाड, पवन ठाणगे, रावसाहेब सोनवणे, उत्तम राजळे, जयश्री गायकवाड, रुपाली बोडखे तसेच आरोग्यतज्ज्ञ डॉ. पटेकर आदी उपस्थित होते.

प्रास्ताविकात प्रा. भगवान काटे यांनी सांगितले की, समाजाच्या आरोग्यवृद्धीसाठी विविध ठिकाणी सातत्याने मोफत आरोग्य शिबिरे आयोजित केली जात आहेत. सर्वसामान्य नागरिकांपर्यंत आरोग्यसेवा पोहोचविण्याचा प्रामाणिक प्रयत्न संस्थेच्या माध्यमातून केला जात असून, गरजू रुग्णांच्या चेहऱ्यावर आनंद फुलविणारा हा उपक्रम समाजासाठी अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

उद्घाटनप्रसंगी बोलताना पंडितराव गुरूजी म्हणाले की, आरोग्य म्हणजे खरी संपत्ती आहे. मात्र, आजच्या धकाधकीच्या जीवनशैलीमुळे अनेक जण स्वतःच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करत आहेत. परिणामी हृदयरोग, मधुमेह, उच्च रक्तदाब, मानसिक ताणतणाव यांसारख्या आजारांचे प्रमाण वाढत आहे. अशा परिस्थितीत मोफत सर्व रोगनिदान शिबिरे ही समाजासाठी मोठा आधार ठरत आहेत. वेळेवर आजाराचे निदान झाल्यास गंभीर आजारही सहज टाळता येतात, असे त्यांनी सांगितले.

या शिबिरामध्ये रक्तदाब, साखर, हिमोग्लोबिन, हृदय तपासणी, हाडांची घनता, यकृत कार्यक्षमता, फुफ्फुस तपासणी, वजन, बीएमआय आदी विविध चाचण्या करण्यात आल्या. या शिबिरात ज्येष्ठ नागरिक व महिलांनी सहभाग नोंदवला.

आरोग्यविषयक उपयुक्त माहिती राजाराम रोहकले व मेजर पर्वतराव हराळ यांनी दिली. डॉ. पटेकर यांनी सदृढ व निरोगी जीवनशैलीबाबत मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मेजर शिवाजी वेताळ यांनी केले. आंधळे सर यांनी आभार मानले.




बी चेंज फाऊंडेशन'तर्फे प्रा. प्रभाकर गवांदे यांचा 'राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्काराने' गौरव करण्यात आला.

# बी चेंज फाऊंडेशन'तर्फे प्रा. प्रभाकर गवांदे यांचा 'राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्काराने' गौरव


नगर – महाराष्ट्र राज्यातील शिक्षण क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या शिक्षकांचा सन्मान करण्यासाठी 'बी चेंज फाऊंडेशन' तर्फे साईनगरी येथे राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार वितरण समारंभ पार पडला. या सोहळ्यात अहिल्यानगर जिल्ह्याचा अभिमान असलेले 'गवांदे मॅथ्स क्लासेस'चे संचालक आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे गणित विषयातील सुवर्णपदक विजेते प्रा. प्रभाकर गवांदे यांना 'राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्काराने' गौरविण्यात आले.

प्रा. गवांदे हे केवळ शिक्षक नाहीत, तर विद्यार्थ्यांच्या यशस्वी आयुष्याचा पाया घालणारे प्रेरक मार्गदर्शक आहेत. त्यांनी गणितासारख्या अवघड विषयाला विद्यार्थ्यांसाठी सुलभ, समजण्यासारखा आणि आवडीचा बनवण्याचे काम गेली अनेक वर्षे सातत्याने केले आहे. त्यांच्या अध्यापनशैलीत शिस्त, समर्पण आणि विद्यार्थ्यांप्रती असलेले आपुलकीचे नाते दिसून येते.

शिक्षण क्षेत्रातील त्यांच्या कार्याचा गौरव करत 'बी चेंज फाऊंडेशन' च्या प्रतिनिधींनी सांगितले की, प्रा. गवांदे हे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी कार्यरत राहणारे आदर्श शिक्षक आहेत. त्यांनी गणित विषयावरील भीती दूर करून विद्यार्थ्यांना आत्मविश्वास आणि ध्येयदृष्टी दिली आहे.

समाजात शिक्षकाचे स्थान केवळ शिक्षण देणारे नव्हे, तर माणूस घडवणारे असे असते, आणि याचा सर्वोत्तम प्रत्यय प्रा. गवांदे यांच्या कार्यातून येतो. त्यांची मेहनत, निष्ठा आणि विद्यार्थ्यांप्रती असलेली आत्मीयता पाहता हा पुरस्कार त्यांच्या योग्यतेचा खरा सन्मान ठरतो. कार्यक्रमस्थळी उपस्थित विद्यार्थी, पालक आणि शिक्षणप्रेमी नागरिकांनी टाळ्यांच्या गजरात त्यांचा गौरव साजरा केला.

# दिलीतील आंतरराष्ट्रीय उर्दू परिषदेसाठी नगरच्या डॉ. कमर सुरुर यांना निमंत्रण



नगर – उर्दू भाषेच्या संवर्धनासाठी राष्ट्रीय परिषद, नवी दिल्ली ही भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयाच्या अंतर्गत कार्यरत असलेली एक स्वायत्त संस्था आहे. ज्याचे उद्दिष्ट उर्दू भाषा आणि साहित्याचा प्रचार आणि प्रसार करणे आहे. परिषदेच्या व्यावहारिक उपक्रमांची व्याप्ती उर्दूच्या संवर्धनासाठी विविध अभ्यासक्रम आयोजित करणे आणि राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय चर्चासत्रे आणि परिषदांचे आयोजन करणे आहे. या संदर्भात परिषद ६ ते ८ फेब्रुवारी दरम्यान दिल्ली येथे बहुभाषिक भारतातील उर्दू भाषा आणि संस्कृती या शीर्षकाने तीन दिवसीय आंतरराष्ट्रीय उर्दू परिषद आयोजित करत आहे. या निमित्ताने ८ फेब्रुवारी रोजी संध्याकाळी ६ वाजता जामिया मिलिया इस्लामिया, नवी दिल्ली येथील एम.ए.अन्सारी सभागृहात एक कविता वाचनाचे आयोजन देखील केले जात आहे. ज्यामध्ये डॉ.कमर सुरुर यांना सहभागी होण्याचे आमंत्रण देण्यात आले आहे. डॉ.कमर सुरुर यांनी यापूर्वीही देश व परदेशात अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय उर्दू परिषदांसाठी सहभागी होऊन नगरचे नाव उंचविले आहे.

# विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्याचा संस्थेचा सातत्यपूर्ण प्रयत्न

### प्रा. सुनील जाधव यांचे प्रतिपादन; श्री संत सावता आश्रम शिक्षण संस्थेच्या वार्षिक स्नेहसंमेलन



श्री संत सावता आश्रम शिक्षण संस्थेच्या विद्यालयाच्या वार्षिक स्नेहसंमेलनाचे उद्घाटन संस्थेचे सचिव प्रा. सुनील जाधव यांच्या हस्ते झाले. यावेळी संस्थेचे विश्वस्त नितीन पुंड, विष्णुपंत म्हस्के, देवा होले, जालिंदर बोरुडे, मुख्याध्यापक राजीव घोलप, राजकुमार शिंदे यांच्यासह संस्थेचे पदाधिकारी, शिक्षकवृंद व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

नगर – सध्या संस्थेच्या शाळेचा जिर्णोद्धार सुरू असून पुढील वर्षी नव्या व अधिक सुसज्ज जागेमध्ये वार्षिक स्नेहसंमेलनाचे आयोजन करण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांना अद्ययावत व सोयीसुविधांनी युक्त शैक्षणिक वातावरण मिळावे, या हेतूने हा जिर्णोद्धार करण्यात येत असून संस्था भविष्यात आधुनिक शिक्षण सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी कटिबद्ध आहे, असे प्रा. सुनील जाधव यांनी स्पष्ट केले.

श्री संत सावता आश्रम शिक्षण संस्थेच्या वतीने संचलित महात्मा फुले विद्यामंदिर व सावित्रीबाई फुले माध्यमिक विद्यालयाच्या वार्षिक स्नेहसंमेलनाचे उद्घाटन संस्थेचे सचिव प्रा. सुनील जाधव यांच्या हस्ते झाले. विद्यार्थ्यांच्या कला, क्रीडा व सांस्कृतिक गुणांना व्यासपीठ मिळावे, या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या स्नेहसंमेलनास शिक्षक, पालक व विद्यार्थ्यांची उपस्थिती लाभली.

पुढे बोलताना प्रा. जाधव यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांच्या अंगी दडलेल्या विविध कलागुणांना वाव मिळावा यासाठी संस्था दरवर्षी स्नेहसंमेलनासह विविध सांस्कृतिक व शैक्षणिक उपक्रमांचे आयोजन करीत असते. या शाळेमध्ये प्रामुख्याने सर्वसामान्य व कष्टकरी कुटुंबातील विद्यार्थी शिक्षण घेत असून, त्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणासोबतच आत्मविश्वास, संस्कार व व्यक्तिमत्त्व विकासाची संधी मिळावी, हाच संस्थेचा मुख्य उद्देश असल्याचे त्यांनी नमूद केले.

याप्रसंगी संस्थेचे विश्वस्त नितीन पुंड यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, शाळा ही केवळ शिक्षण देणारी संस्था नसून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचे केंद्र आहे. विद्यार्थ्यांनी शिक्षणाबरोबरच कला, क्रीडा व सांस्कृतिक उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. संस्थेच्या माध्यमातून भविष्यातही विद्यार्थ्यांसाठी दर्जेदार सुविधा उपलब्ध करून देण्यात येतील, असे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमास संस्थेचे विश्वस्त नितीन पुंड, विष्णुपंत म्हस्के, देवा होले, जालिंदर बोरुडे, मुख्याध्यापक राजीव घोलप, राजकुमार शिंदे यांच्यासह संस्थेचे पदाधिकारी, शिक्षकवृंद व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या विविध सांस्कृतिक कार्यक्रमांनी उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रम यशस्वीतेसाठी शिक्षक व विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

# धम्माल मनोरंजन

## सुविचार



पुस्तके ही काळाच्या विशाल सागरातून आपणास घेऊन जाणारी जहाजे होत.

## दिनविशेष ०६ फेब्रुवारी

१६६५: 'ॲनी' ग्रेट ब्रिटनच्या राणी यांचा जन्म. (मृत्यू : १ ऑगस्ट १७१४)

१९११: 'रोनाल्ड रेगन' अभिनेते आणि अमेरिकेचे ४० वे राष्ट्राध्यक्ष यांचा जन्म. (मृत्यू: ५ जून २००४)

१९१५: 'रामचंद्र नारायण द्विवेदी' राष्ट्रकवी यांचा जन्म. (मृत्यू: ११ डिसेंबर १९९८)

१९४५: 'बॉब मार्ली' जमैकन संगीतकार यांचा जन्म. (मृत्यू: ११ मे १९८१)

१९५२: 'डॉ. रिक चार्ल्सवर्थ' ऑस्ट्रेलियन हॉकीपटू, हॉकी प्रशिक्षक, क्रिकेटपटू आणि राजकारणी यांचा जन्म.

१९८३: 'श्रीशांत' क्रिकेटपटू यांचा जन्म.

६ फेब्रुवारी दिनविशेष – ६ मृत्यू :

१८०४: 'जोसेफ प्रिस्टले' इंग्लिश रसायनशास्त्रज्ञ यांचे निधन. (जन्म: १३ मार्च १७३३)

१८९९: 'लिओ वॉन कॅप्रीव्ही' जर्मनी देशाचे चांसलर यांचे निधन. (जन्म: २४ फेब्रुवारी १८३१)

१९३१: 'मोतीलाल गंगाधर नेहरू' भारतीय स्वातंत्र्यसेनानी, स्वराज्य पक्षाचे संस्थापक सदस्य, कायदेपंडित यांचे निधन. (जन्म: ६ मे १८६१)

१९३९: 'सर सयाजीराव गायकवाड (तिसरे)' बडोद्याचे महाराज यांचे निधन.(जन्म: १० मार्च १८६३)

१९५२: 'जॉर्ज (सहावा)' इंग्लंडचा राजा यांचे निधन. (जन्म: १४ डिसेंबर १८९५)

१९७६: 'ऋत्विक घटक' चित्रपट निर्माते आणि पटकथालेखक यांचे निधन. (जन्म: ४ नोव्हेंबर १९२५)

१९९३: 'आर्थर ॲश' अमेरिकन टेनिस खेळाडू यांचे निधन. (जन्म: १० जुलै १९४३)

२००२: 'मॅक्स पेरुत्झ'– ऑस्ट्रियन–इंग्रजी जीवशास्त्रज्ञ आणि शैक्षणिक नोबेल पारितोषिक यांचे निधन. (जन्म: १९ मे १९१४)

२०२२: 'लता मंगेशकर' भारतरत्न, पद्म विभूषण, पद्म भूषण, राष्ट्रीय चित्रपट, दादासाहेब फाळके पुरस्कार, भारतीय जगप्रसिद्ध पार्श्वगायिका यांचे निधन.(जन्म: २८ सप्टेंबर १९२९)

२०२३: 'बी. के. एस. वर्मा' भारतीय चित्रकार यांचे निधन. (जन्म: ५ सप्टेंबर १९४८)

### भारतातील प्रमुख दैनिके –प्रादेशिक भाषा

| | | |
|---|---|---|
| आज | हिंदी | कानपूर, वाराणसी |
| अमर उजाला | हिंदी | आग्रा |
| आर्यावर्त | हिंदी | पाटणा |
| ट्रिब्युन | हिंदी | अंबाला, चंदीगढ |
| नवभारत टाइम्स | हिंदी | नवी दिल्ली, मुंबई |
| प्रताप | हिंदी | दिल्ली |
| विश्वामित्र | हिंदी | कोलकाता,कानपूर, पाटणा, मुंबई |
| हिंदुस्तान | हिंदी | दिल्ली, जालंधर |
| तेज | उर्दु | दिल्ली |
| रेडियन्ट | उर्दु | मुंबई |

### विनोद

**शिक्षक**–'भारताची राजधानी कोठे आहे?'

**राजू**–गुरुजी, भारतात.

**संजू**–नाही गुरुजी, भूगोलाच्या पुस्तकातील पान २० वर आहे.

## महाशब्दकोडे

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | ४ | | ५ | | ६ | ७ | ८ | ९ | |
| १० | | | ११ | | | | | | १२ | | | |
| | | १३ | | | १४ | | १५ | | | | १६ | १७ |
| | १८ | | | १९ | | | | | | २० | | |
| २१ | | | २२ | | | २३ | | २४ | | | २५ | |
| | | | | | २६ | | | | | २७ | | |
| २८ | | | | २९ | | ३० | | | ३१ | | | |
| | | | ३२ | | ३३ | | | ३४ | | ३५ | | |
| ३६ | ३७ | ३८ | | ३९ | | | ४० | | | | | ४१ |
| | ४२ | | | ४३ | | | | | ४४ | | | |
| ४५ | | | | | | ४६ | | | | | ४७ | |
| ४८ | | | | | ४९ | | | | ५० | ५१ | | ५२ |
| ५३ | | | ५४ | | | | | ५५ | | | | |

### आडवे संकेत

१) शाहरुख खान, माधुरी, करिश्मा यांचा एक चित्रपट
६) रावण
१०) एक वृक्ष
११) डोक्याच्या दिशेला
१२) पगार १३) वर्ष
१४) शेतात वाळलेले शेण
१६) शेकाटा
१८) हल्ला १९) मौज
२०) दिवसाचा मध्य
२१)उपवासाचे दिवशी भाजलेल्या धान्याच्या पदार्थावर निर्वाह
२३)राजाला साजेल शोभेल असे
२५) उत्सवाचा दिवस
२६) कारकिर्द
२७) आठांचा समुदाय
२८) विठ्ठलाचे xx
३०) कर्ण
३२) आंधारात वावरणारा
३४) ठोकाठोकी
३६) कठोर हृदयाचा
३९) ठेव म्हणून ठेविलेले द्रव्य
४२) नवरदेव
४३) धान्याचा ढिग
४४) कुडवाची लोखंडी पट्टी
४५) दर्पण ४६) हवा व पाणी
४८) झेरॉक्स, प्रत
४९) फारशी भाषेनुसार तरुण
५०) दरवाजाजवळील जमीन
५३) मानव जातीचा
५४) हुशारी, चपळता
५५) प्रयोजण

### उभे संकेत

१) दिन २) सुटलेले केस
३) पवित्र ४) फणसाचा गाभा
५) राक्षस ७) एका नदीचे नाव
८) अब्रू, आब ९) वर्षाचे दिवस
१३) सोन्याचा व्यापारी
१४) भूपती१५) गोड पदार्थाचे जेवण
१७) अनावश्यककामे करणारा
१८) पसंत, स्विकार
१९) घाण, विष्ठा
२१) गहू, जव, तांदूळ व मूग ही पाच धान्य
२२) एका जातीचे नाव
२३) राज्यासंबंधी कामे
२४)झाडाच्या तोडून काढलेल्या फांद्या
२९) जिकडे गेल्या तिकडेच रमणारा
३१)वाचेच्या चार अवस्था पैकी एक
३३)एक मादक द्रव्य ३४) सत्कार
३५) मावशीपासून जन्मलेला
३७) स्वातंत्र्यवीर... ३८) नमुनेदार, वस्ताद ४०) श्रीमंत
४१) कशाला xx जातो रे बाबा कशाला पंढरी जातो ४४) तेजस्वी
४५) तोंड, मुख ४६) हवेत राहणारे
४७) चतकोर ४९) म्हातारपण ५१) युद्ध ५२) माहित

### मागील उत्तर

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| कै | ला | स | ना | थ | | म | स | ल | त | | भा | त |
| वा | ड | गा | | क | म | ल | ह | स | न | | र | |
| री | | | आ | वा | ज | | ज | | | ओ | ती | व |
| | सी | ता | | | | गो | | मे | | वा | | |
| ज | मा | | ट | च | ट | ची | त | | घ | | मा | ग |
| य | व | | कु | | क | ळ | | पा | न | प | रा | ग |
| कि | र्ती | | रे | श | म | | क | ल | दा | र | | न |
| सा | | गो | | | क | | व | क | ट | | | भ |
| न | गा | रा | | घ | टो | त्क | च | | | म | दि | रा |
| | व | | फ | र | क | | | गो | ख | ले | | री |
| वा | स | रु | | दा | | म | शा | ल | | शि | ग | |
| ट | क | | को | र | ड | वा | हू | | आ | या | बा | या |
| प | र | भा | रे | | ग | ळ | | दा | ता | | ड | |

## STUDENT CAREER FOR MPSC EXAM



१) अन्न समस्या सोडविण्यासाठी विकसनशील देशांनी इ.स. १९६६ मध्ये कोणती योजना सुरु केली?
अ)सफेद क्रांती ब)हरितक्रांती क) लाल क्रांती ड) पीतक्रांती

२) अणुमधून बाहेर पडणाऱ्या शलाकेचा अभ्यास करण्यासाठी खालीलपैकी कशाचा उपयोग होतो?
अ)जोशीलिमिट ब)चंद्रशेखर परिणाम क)झिमान परिणाम ड)रामन परिणाम

३) प्रदुषनाचे तीन महत्त्वाचे प्रकार कोणते?
अ)वातावरण, जमीन, हवा ब)पाणी, हवा, वातावरण
क)जमीन, पाणी, हवा ड)पाणी, जमीन, वातावरण

४) रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया पतचलनाचे नियंत्रण कशाप्रकारे करते?
अ)रोख राखीव निधीचे प्रमाण बदलने ब)खुला बाजार व्यवहार
क)बँक दर ड)वरिल सर्व

५) आयझॅक न्यूटनने कारणवादाला वैज्ञानिक पद्धतीचा ...... ठरविले होते?
अ)सूत्र ब)आधारस्तंभ क)उत्पत्ती ड) परिणाम

६) मानसाच्या शरिरातील सर्व जीवन किती तासानंतर समाप्त होते?
अ)२२ तास ब)२तास क)५ तास ड)४४ तास

७) जेव्हा विज्ञानाचा मुळ उद्देश केवळ घटनांचे वर्णक किंवा स्पष्टीकरण करावयाचा असतो तेव्हा त्यास काय म्हणतात?
अ)नियोजीत शास्त्रब)शुद्ध शास्त्र क)सामाजिक शास्त्र ड)नैसर्गिक शास्त्र

८) ब्रिटीशांच्या नव्या जमीन महसुल व्यवस्थेचा भारतीय शेतकऱ्यांवर काय परिणाम झाला?
अ)शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान थांबले
ब)जमीन महसूल भरने सोपे झाले क)शेतकरी कर्जबाजारी झाले
ड)शेतकरी जमीनीचे मालक बनले

९) प्रांतीक कायदेमंडळाच्या निवडणुका भारतात सर्वप्रथम कधी झाल्या?
अ)१९३७ ब)१९३२ क)१९३४ ड) १९३९

१०) खालीलपैकी कोणता चुंबकिय पदार्थ आहे?
अ)ग्रॅनाईट ब)लिग्नाईट क)कोबाल्ट ड)बेसॉल्ट

११) रक्तवाहिन्यांच्या कोणत्या दोषामुळे अर्धांगवायू, गॅगरिन किंवा हृदयरोग होण्याची शक्यता असते?
अ)हिमोफिलीया ब)धमनीकाठीण्य क)मधुमेह ड)वेगळे उत्तर

१२) नागाच्या विषाचा उपयोग करुन तयार केलेला खात्रीलायक रस कशाविरुद्ध परिणामकारक आहे?
अ)फ्लु ब)पटकी व क्षय क)घटसर्प ड) दमा आणि शतांत्र ज्वर

१३) गोड्या पाण्यातील मत्स्योत्पादनासाठी खालीलपैकी कोणता जिल्हा प्रसिद्ध आहे? अ)भंडारा ब)बुलढाणा क)रायगड ड)रत्नागिरी

१४)१ लिटर म्हशीच्या दुधापासून सर्वसाधारणपणे किती ग्रॅम खवा तयार होतो? अ)सव्वाशे ग्रॅम ब)दिडशे ग्रॅम क)अडीचशे ग्रॅम ड) ५०० ग्रॅम

१५) शहानपण हे सत्तेत आहे दैन्यात नाही. स्वातत्र्यहेच प्रत्येक राष्ट्राचे अंतिम साध्य आहे असे कोणी म्हटले आहे?
अ)लो. टिळक ब)म.गांधी क)ना. गोखले ड) न्या. रानडे

१६) कोणत्या देशाच्या शास्त्रज्ञाने पटकी या रोगावर मुखावाटे घेता येणारी लस विकसित केली?अ)भारत ब)ग्रेट ब्रिटन क)रशिया ड)जपान

१७) जर 'राळेगण सिद्धी' हे नाव 'रागसिळेणद्धी' असे लिहिले तर 'अहमदनगर' हे नाव कसे लिहिणार?
अ)अहमदनगर ब)अहमनगरद क)नगरअहमद ड)अमनरहद्‌ग

१८) निलगिरी पर्वतावरील सर्वात उंच शिखर कोणते?
अ)कळसूबाई ब)गुरुशिखर क)दोडाबेट्टा ड) केर

१९) भारताकडून चहा आयात करणारा प्रमुख देश कोणता?
अ)ब्रिटन ब)अमेरिका क)फ्रान्स ड)जपान

२०) लॉर्ड कर्झनचे संपूर्ण आशियाचे पहिले वृत्तपत्र म्हणून ......... या वृत्तपत्राचा गौरव केला?
अ)द टाईम्स ऑफ इंडिया ब)द पायोनिअर
क)द स्टेट्समन ड)द इंग्लिशमन

२१) महात्मा गांधी यांनी सत्याग्रहाचा पहिला प्रयोग कोठे केला?
अ)खेडा ब)चंपारण्य क)मुळशी ड)बार्डोली

२२) डॉ. आंबेडकर यांनी ...... येथील चवदार तळे येथे सत्याग्रह करुन मनुस्मृती जाळली?
अ)अलीबाग ब)महाड क)रत्नागिरी ड)पनवेल

२३) रास्त गोफ्तार हे मासिक कोणी सुरु केले?
अ)दादाभाई नौरोजी ब)अक्षयचंद्र सरकार
क)नवगोपाळ मित्र ड)भूदेव मुखोपाध्याय

२४) 'मुंबईचा सिंह' म्हणून कोणला ओळखले जात असे?
अ)दादाभाई नौरोजी ब)न्या. रानडे
क)ना. गो. कृ.गोखले ड)फिरोजशहा मेहता

२५) प्रतिसरकारची स्थापना कोणी व कोठे केली?
अ)क्रांतीसिंह नाना पाटील– सातारा
ब)आचार्य विनोबा भावे– पवनार
क)भाई कोतवाल– नागपूर ड) जनरल आवारी– नागपूर

२६) लाहोर येथे खालसा कॉलेजची स्थापना कोणी केली?
अ)पं. नेहरु ब)डॉ. आंबेडकर क)दयालदास ड)विनोबा भावे

२७) खालीलपैकी कोणाच्या अध्यक्षतेखाली देशात सहावा वेतन आयोग नेमण्यात आला?
अ)न्या. जोशी ब)न्या. श्रीकृष्ण
क)न्या. नानावटी ड)न्या. महाजन

**उत्तर: (१–ब), (२–क), (३–क), (४–ड), (५–ब), (६–क), (७– ब), (८–क ), (९–अ),(१०–क), (११–ब ), (१२–क), (१३–अ), (१४–क),(१५–अ), (१६–अ), (१७–ड), (१८–क), (१९–अ), (२०–ड), (२१–ब), (२२–ब), (२३–अ), (२४–ड ), (२५–अ), (२६–क), (२७–ब),**

## फिल्मी शब्दकोडे



| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | | २ | | ३ | | | | ४ | ५ | | ६ |
| | | | | | | | | | | | | |
| | ७ | | | | | | | ८ | | | | |
| | | | | ९ | | | | | | | १० | |
| ११ | | | | | | | | १२ | | | | |
| | | | १३ | | | | १४ | | | १५ | | |
| | | | | | | | १६ | १७ | | | | |
| १८ | | १९ | | | २० | | | | | २१ | | |
| | | | | | | | | | | | | |
| | | | | | २२ | | २३ | | | २४ | | २५ |
| | | २६ | | | | | | | | २७ | | |
| | | | | | | | | | | | | |
| | | २८ | | | | | | २९ | | | | |

### आडवे संकेत

१) सन् २००२ में बनी इस फिल्म में हृत्विक रोशन, करीना कपूर और रानी मुखर्जी थे.
४) मोक्ष इस फिल्म का नायक. (सिर्फ सरनेम)
७)xx मुखर्जी (गायीका)
८) अनिल कपूर, वहिदा रहेमान, दिलीप कुमार, रती अग्निहोत्री और अमरिश पुरी अभिनीत एक फिल्म.
९) सन् १९९३ में दिपक बाहरी निर्देशित इस फिल्म में अजय देवगन और रविना टंडन थे.
१०) पाप का xx (फिल्म)
११) जिनत xxx (नायीका)
१२) तेरे xx(फिल्म)
१३) xx एण्ड मिसेस खिलाडी
१५) ओ xx तेरे बिना भी क्या जीना.... (गाना)
१६) सन् २००२ में अब्बास मस्तान निर्देशित इस फिल्म में बॉबी देओल और अक्षय खन्ना थे.
१८) जिस्म फिल्म का नायक.
२१) दिसी xx (नायीका)
२२) सन् १९८० में बनी सितारा इस फिल्म की नायीका.
२६) कुछ कुछ मिठी (फिल्म)
२७) ग्रेसी सिंह की पहिली फिल्म.
२८) मनोज वाजपेयी, उर्मिला मातोंडकर, संजय पुरी और इशा कोपीकर की एक फिल्म.
२९) ये लाल रंग कब मुझे..... यह गाना इस फिल्म का है.

### उभे संकेत

१) आप xx अच्छे लगने लगे (फिल्म)
२) अमिताभ बचन और शत्रुघ्न सिन्हा की एक फिल्म.
३) सन् २००३ में बनी फिल्म खुशी की नायीका.
५) जितेंद्र, जयाप्रदा, श्रीदेवी और राज किरण की एक फिल्म.
६) सन् १९९६ में बनी प्रेमग्रंथ फिल्म के संगीतकार.
७) सन् २००२ में बनी तुमको ना भुल पाऐंगे इस फिल्म का नायक.
८) दिवाना xxx (फिल्म)
१४) जीने की xx (फिल्म)
१५) xx की सहेली (फिल्म)
१७) विनोद खन्ना, मिनाक्षी शेषांद्री और सोनु वालिया और राज बब्बर की एक फिल्म.
१८) बाजीगर इस फिल्म में बाबुलाल का किरदार किसने निभाया.
१९) सन् १९९९ में बनी लावारीस इस फिल्म का नायक.
२०) सन् १९९९ में बनी जय हिंद इस फिल्म के निर्देशक.
२३) इस फिल्म में अनिल कपूर और रानी मुखर्जी थे.
२४) सुनील शेट्टी की पहिली फिल्म.
२५) सन् १९९९ में सुनील दर्शन निर्देशित इस फिल्म में अक्षय कुमार और करिश्मा कपूर थे.

### मागील फिल्मी उत्तर

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| क्या | दि | ल | ने | क | हा | | | | | बं | ध | न |
| य | | | | | | | | पा | की | जा | | र |
| हि | रो | हिं | दु | स्था | नी | | अ | | | र | | सि |
| प्या | | | ल्ह | | शा | ह | रु | ख | खा | न | | म्हा |
| र | | सु | न | य | ना | | ना | | | | | |
| है | | | ह | | | | | ह | थि | या | र | |
| | व | | म | स्त | क | लं | द | र | | दे | | अं |
| क | र्मा | | ले | | र | | रा | | प्या | | जी | त |
| भी | | | जा | | न | ज | र | के | सा | म | ने | |
| ना | | | ऐं | | अ | | | सी | | | दो | स्त |
| क | च्चे | धा | गे | | जू | | | | स | | | |
| भी | | | | कौ | न | स | च्चा | कौ | न | झु | ठा | |
| | ह | नी | मु | न | | | | | म | | | |

## पाक कला

### बेसन पराठा

साहित्यः बसेनाचे पीठ–२५ ग्रॅ., गव्हाचे पीठ ७५ ग्रॅ., मीठ–चवीनुसार, ओल्या मिरच्या ३–४ लसूण पाकळ्या ७–८ आले कीस–एक टी स्पून, ओवा–पाऊण टी स्पून,कांदा, एका मोठ्या ताज्या लिंबाचा रस–दोन टी स्पून तूप.

कृतीः बेसनात बारीक चिरलेला लसूण, कांदा, आले, मिरच्या घाला. थोडे तूप यात घाला व चवीनुसार मीठ घाला व हाताने कालवा. कणीक मळा. मळताना त्यात मीठ घाला. कणकेचा उंडा करा. प्रत्येकात वरील बेसन, थोडे थोडे भरा. परत उंडा हातावर गोलसर मळा. लाटा व नेहमी करतो तसा पराठा करा.

### दही फुलका

साहित्य : कणीक एक पेला, तेवढाच मैदा, मीठ, कणकेएवढे दही, तूप.

कृती : कणीक, मैदा,मीठ एकत्र करा. दह्यात मळा. बुक्के मारुन चांगली मळा. लहान गोळे बनवा व फुलके करा. गरम असतानाच तूप लावा.

# डोंगरगणची शाळा भरणार आता थेट चंद्रावर....

## नासाच्या आर्टेमिस -२ मोहिमेच्या ओरियन यानासोबत जाणार विद्यार्थी आणि शाळेच्या नावाचे एस डी कार्ड चंद्रावर

नगर - तालुक्यातील डोंगरगण जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील ३९ विद्यार्थी व दोन शिक्षकांची नावे थेट चंद्रावर पाठवली जाणार आहेत. 'नासा' या आंतरराष्ट्रीय अवकाश संशोधन संस्थेच्या 'आर्टेमिस-२' मोहिमेत त्यांचा ऐतिहासिक सहभाग नोंदवला जाणार आहे. या विद्यार्थ्यांच्या नावांचे बोर्डिंग पास 'नासा'कडून देण्यात आले आहे. हा क्षण शाळेसाठी अभिमानास्पद ठरत आहे. या मोहिमेत व्हर्चुअल गेस्ट म्हणून सहभागी होण्याबाबत नासाने आवाहन केले होते. या उपक्रमात नासाकडून केलेल्या या आवाहनाला प्रतिसाद म्हणून डोंगरगण शाळेने नोंदणी केली होती. यशस्वीरित्या विद्यार्थ्यांची नोंदणी झाल्यानंतर नासाकडून विद्यार्थी आणि शिक्षकांचे बोर्डिंग पास पाठवण्यात आले. या बोर्डिंग पासचे वितरण आज शाळेत विद्यार्थ्यांना करण्यात आले. त्यांना मोहिमेचे प्रक्षेपण ही व्हर्च्युअली पाहता येणार आहे. या विद्यार्थ्यांची नावे एका एसडी कार्ड मध्ये संग्रहित करून ओरियन यानाद्वारे चंद्राकडे पाठवली जाणार आहेत.



नासाच्या आर्टेमिस -२ मोहिमेच्या ओरियन यानासोबत विद्यार्थी आणि शाळेच्या नावाचे एस डी कार्ड चंद्रावर पाठविले जाणार आहे.




निखिल कदम, युवा गायकवाड, आरूष चांदणे या प्रवेश पात्र विद्यार्थ्यांसह प्रिया कदम, काव्या चांदणे, शंभू चांदणे, सार्थक गायकवाड, ममता दळे, रुचिता कदम, संग्राम चांदणे, सम्राट चांदणे, चैतन्य चांदणे, प्रशांत चांदणे, सोहम कदम, श्रेयस शिरसाठ, देव ठोंबे, मयूर आहेर, श्रावणी चांदणे, आरोही चांदणे, आकांक्षा चांदणे, अक्षरा चांदणे, रिहा पठाण, आरुषी चांदणे, प्रिया गोलवड, श्रावणी भांबळ, आयुष चांदणे, अजय शिरसाठ, श्रीनाथ हिलगुडे, अनुष्का हिलगुडे, श्रुती भांबळ, अक्षदा दळवी, अथर्व चांदणे, अक्षद शिरसाठ. जय शिरसाठ, रुद्र ठोंबे, समर्थ चांदणे, समर्थ कदम, शुभम दळे, साईनाथ पवार, राजु पवार, कृष्णा बर्डे या विद्यार्थ्यांचे व शिक्षक नारायण मंगलारम आणि ज्ञानेश्वर चेडे यांच्यासह यावेळी शाळेचा ही बोर्डिंग पास विद्यार्थ्यांच्या हाती देण्यात आला.

या उपक्रमामागे शाळेतील राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त शिक्षक नारायण मंगलारम यांची कल्पकता आणि विद्यार्थ्यांचा विकास करण्यासाठीची धडपड दिसून येते. विद्यार्थ्यांना या बाल वयात अंतराळ मोहीम, आंतरराष्ट्रीय अवकाश स्थानक, अंतराळवीर यांची माहिती व्हावी, त्यांच्या डोळ्यात स्वप्ने पेरली जावीत म्हणून आम्ही हा उपक्रम आयोजित केला होता असे बोर्डिंग पास वितरण वेळी मंगलारम म्हणाले,

आर्टेमिस मोहिमेची समग्र माहिती, अंतराळात गुरुत्वाकर्षण विरहित वातावरणात अंतराळवीर कसे राहतात, कसे खातात, झोपतात, हे सर्व विद्यार्थ्यांना माहित व्हावे म्हणून आम्ही व्हिडिओच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना माहिती दिल्याचे उपक्रमशील शिक्षक ज्ञानेश्वर चेडे म्हणाले. आर्टमिस-२' ही मोहीम एप्रिल २०२६ पूर्वी फ्लोरिडातील केनेडी स्पेस सेंटर येथून प्रक्षेपित होईल. अंतराळवीर चंद्राच्या पलीकडे समारे ६ लाख ८५ हजार मैल प्रवास करून पॅसिफिक महासागरात परतणार आहेत. याची माहिती जगभरातील सर्वसामान्य जनतेला व्हावी साठी नासाने हा उपक्रम आयोजित केला आहे. या उपक्रमाबद्दल शिक्षणधिकारी भास्कर पाटील व नगरच्या गटशिक्षणाधिकारी तृप्ती कोलते, विस्तार अधिकारी संजय बोबडे, केंद्रप्रमुख बाबागोसावी डोंगरगण शाळेतील विद्यार्थ्यांचे कौतक केले आहे.

### नासा ५४ वर्षांनी चंद्रावर पाठवणार अंतराळवीर

नासा ५४ वर्षांनंतर चंद्रावर अंतराळवीर पाठवणार आहे. आर्टेमिस-२ मोहिमेंतर्गत पुढील वर्षी रीड वैसमन, व्हिक्टर ग्लोवर, क्रिस्टिना कोख आणि जेरेमी हंनसन हे ४ अंतराळवीर १० दिवस चंद्राभोवती प्रदक्षिणा घालून पृथ्वीवर परत येतील. ही मोहीम भविष्यात पुन्हा चंद्रावर उतरण्यासाठी आवश्यक असलेल्या प्रणालींची तपासणी करण्याचे काम करेल. नासाने म्हटले आहे की, अर्टेमिस २ मानवाला चंद्रावर परत नेण्याच्या दिशेने एक महत्त्वाची मोहीम ठरेल.

# नाना डोंगरे यांना 'दोस्ती'चा समाजसेवा पुरस्कार प्रदान

## श्रीरामपूरला लोककलावंत मजनूभाई शेख स्मृती गौरव सोहळ्यात झाला सन्मान

नगर - दोस्ती फाउंडेशनच्या वतीने पै. नाना डोंगरे यांना समाजसेवा पुरस्काराने गौरविण्यात आले. श्रीरामपूर येथील शासकीय विश्रामगृहात आयोजित लोककलावंत पै. मजनूभाई शेख राज्यस्तरीय स्मृती गौरव पुरस्कार सोहळ्यात हा सन्मान प्रदान करण्यात आला. सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक व पर्यावरण संवर्धन क्षेत्रात केलेल्या कार्याची दखल घेऊन डोंगरे यांना पुरस्कार देण्यात आला.



दोस्ती फाउंडेशनच्या वतीने पै. नाना डोंगरे यांना समाजसेवा पुरस्काराने गौरविण्यात आले.

या पुरस्कार सोहळ्याचे अध्यक्षस्थान साहित्यिक तसेच महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे प्रा. डॉ. महावीरसिंग चौहाण यांनी भूषविले. प्रमुख पाहुणे म्हणून श्रीरामपूरच्या आरटीओ राणीताई सोनवणे, सेवानिवृत्त पोलीस अधिकारी सुभाष सोनवणे, माजी आमदार भाऊसाहेब कांबळे, राष्ट्रीय लोककलावंत दिव्यांग व निराधार संघर्ष समितीचे राज्याध्यक्ष संदीपकुमार बोरकर, संस्थेचे अध्यक्ष व कार्यक्रमाचे संयोजक रज्ञाकभाई शेख, कवी आनंदा साळवे, सुनिता वाळुंज, कवयित्री श्वेता सावंत, संदीप रासकर उपस्थित होते.

कार्यक्रमात लोककलावंतांनी वासुदेव, गोफ्लधळी, पोतराज, पिंगळे आदी पारंपरिक लोककला सादर करून उपस्थितांची मने जिंकली. या लोककला सादरीकरणामुळे कार्यक्रमाची रंगत वाढली होती.

स्व. पै. किसनराव डोंगरे बहुद्देशीय संस्थेचे अध्यक्ष तसेच ग्रामपंचायत सदस्य पै. नाना डोंगरे यांनी नगर तालुक्यासह संपूर्ण जिल्ह्यात ग्रामीण भागात विविध क्षेत्रांत सातत्यपूर्ण सामाजिक कार्य उभारले आहे. संस्थेच्या माध्यमातून त्यांनी सामाजिक, शैक्षणिक, कला, क्रीडा, साहित्य व धार्मिक क्षेत्रात योगदान दिले आहे. ग्रामीण भागात वृक्षारोपण व वृक्षसंवर्धनासाठी विविध उपक्रम राबवून पर्यावरण संवर्धनाबाबत व्यापक जनजागृती निर्माण केली आहे.

स्त्री जन्माचे स्वागत, स्वच्छता अभियान, महिला सक्षमीकरण, मतदार जागृती, जलसंधारण जनजागृती मोहीम, रक्तदान शिबिरे यांसारखे उपक्रम व्यापक स्वरूपात राबविले जात आहेत. युवकांसाठी व्यसनमुक्ती संदर्भातील कार्यक्रम, तसेच गावपातळीवर आरोग्य शिबिरांच्या माध्यमातून ग्रामस्थांना आरोग्यसेवा देण्याचे कार्यही संस्थेमार्फत सुरू आहे. विविध स्पर्धा, महिला बचत गट मेळावे, युवा संमेलनांच्या आयोजनातून समाजाला सकारात्मक दिशा देण्याचा प्रयत्न सातत्याने केला जात आहे.



'अहिल्यानगर आयकॉन अवॉर्ड' मिळाल्याबद्दल डॉ. उद्धव शिंदे यांचा शाल व सन्मानचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला.

# भिंगार स्पोर्ट्स क्लबच्या वर्धापन दिनी डॉ. उद्धव शिंदे यांचा गौरव

नगर - भिंगार स्पोर्टस् क्लबच्या वतीने आयोजित वर्धापन दिन कार्यक्रमात स्नेहबंध सोशल फौंडेशनचे संस्थापक अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे यांना 'अहिल्यानगर आयकॉन अवॉर्ड' मिळाल्याबद्दल शाल व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

समाजसेवा, क्रीडा, आरोग्य व शैक्षणिक क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन हा सन्मान प्रदान करण्यात आला. या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून महात्मा फुले पतसंस्थेचे चेअरमन शरद झोडगे, तसेच छावणी परिषदेचे मनोमीत सदस्य वसंत राठोड, माजी रयत बँकेचे चेअरमन कैलास मोहिते, प्रशिक्षक विठ्ठल काळे, प्रशिक्षक शंकर औरंगे उपस्थित होते.

# ज्ञानेश्वरनगर येथील महिलांचा सार्वजनिक हळदी-कुंकू कार्यक्रम उत्साहात

नगर - ज्ञानेश्वरनगर येथील सर्व महिलांनी एकत्र येत परंपरा, आपुलकी आणि सामाजिक एकोपा जपणारा सार्वजनिक हळदी-कुंकू कार्यक्रम उत्साहात आयोजित केला. या कार्यक्रमास नगरसेविका सौ. दीपाली बारसकर, सौ. संध्या पवार, सौ. रुपाली वारे, सौ. पूनम तवले, सौ. रोशनी त्र्यंबके या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या.



प्रास्ताविक व महत्व सौ. सुनीता तागड यांनी अत्यंत समर्पक शब्दांत विशद केले. त्यांनी संक्रांती सणामागील सामाजिक संदेश स्पष्ट करताना सांगितले की, तीळ जरी रंगाने पांढरा व साधा असला तरी स्नेह वाढवणारा आहे, तर गूळ पिवळा, गोड व मधुर असतो. या दोघांची सांगड घालून तिळगुळ तयार होतो. त्याचप्रमाणे समाजातील वेगवेगळ्या स्वभावाच्या माणसांनी परस्परांशी प्रेम, सौजन्य व आपुलकीने वागले पाहिजे. संक्रांतीच्या निमित्ताने समाजाशी एकरूप होण्याचा संकल्प करून चांगल्या चाली-रीती अंगीकाराव्यात व वाईट प्रवृत्ती दूर केल्यास या सणामागील खरा उद्देश साध्य होईल, असे त्या म्हणाल्या. 'मी प्रत्येकाशी गोड बोलेन' असा संकल्प जर सर्वांनी केला, तर संक्रांत हा सण केवळ तिळगुळ घ्या, गोड बोला एवढ्यापुरता न राहता तो आपल्या विचारांत व कृतीतून दिसून येईल, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. या प्रसंगी चंदूकाका सराफ यांनी विविध स्पर्धांचे आयोजन करून महिलांना संक्रांतीचे वाण दिले. त्यामुळे कार्यक्रमात अधिक रंगत व उत्साह निर्माण झाला.

कार्यक्रमास ज्ञानेश्वरनगर परिसरातील महिला उपस्थित होत्या. सौ. सुनीता तागड, सौ. जगदाळे मॅडम, सौ. नंदा घुले, सौ. अंजली डांगे, सौ. रोहिणी शेळके, सौ. शिला देशमुख, सौ. वनिता गाडे, सौ. रंजना खिलारी, सौ. सुवर्णा घुगरकर, सौ. भाग्यश्री चव्हाण आदी महिलांनी कार्यक्रमाचे नियोजन केले. सामाजिक सलोखा, परंपरेचे जतन आणि महिलांचा सहभाग यांचा सुंदर संगम या सार्वजनिक हळदी-कुंकू कार्यक्रमातून पाहायला मिळाला.

# अहिल्यानगर महापालिकेकडून नो पार्किंगमधील कारवाईच्या दंडाच्या रकमेत कपात

## नव्या दरानुसारच दंड आकारणीच्या ठेकेदार संस्थेला सूचना : महापालिकाआयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांची माहिती

नगर - नो पार्किंग झोनमध्ये लावल्या जाणाऱ्या दुचाकी व चारचाकी वाहनांवर आकारण्यात येणाऱ्या दंडाच्या रकमेत महानगरपालिकेकडून कपात करण्यात आली आहे. दुचाकी व चारचाकी वाहनांच्या टोविंग व क्लॅम्पिंग कारवाईसाठी नव्याने दर निश्चित करण्यात आले असून या दरानुसारच दंड आकारणी करण्याच्या सूचना ठेकेदार संस्थेला करण्यात आल्याची माहिती आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी दिली.

तत्कालीन महासभेने शहरात पे अ‍ॅण्ड पार्क व नो पार्किंग झोनमध्ये कारवाईसाठी धोरण निश्चित करून कारवाईचे दर व पार्किंग शुल्क निश्चित केले होते. त्यानुसार निविदा प्रक्रिया होऊन दिग्विजय एंटरप्रायझेस या संस्थेला हे काम देण्यात आले आहे. गेल्या वर्षभरापासून टप्प्याटप्प्याने पे अ‍ॅण्ड पार्कची व नो पार्किंग झोनची अंमलबजावणी सुरू करण्यात आली आहे. अद्यापही निश्चित केलेल्या सर्व भागात अंमलबजावणी झालेली नाही. नो पार्किंगमधील वाहनांवर ठेकेदार संस्थेकडून कारवाई होत असताना दंडाच्या रकमेबाबत तक्रारी होत आहेत. नागरिकांकडूनही दंडाची रक्कम कमी करण्यासाठी मागणी होत आहे. सदरचे दर हे तत्कालीन महासभेने निश्चित केले होते. त्यात आता स्थायी समितीने फेरबदल करून दर काही प्रमाणात कमी केले आहेत.

नव्या दरानुसार दुचाकी वाहनावर टोविंग कारवाईसाठी -रुपये ५०० +GST, क्लॅम्पिंग कारवाईसाठी -रुपये ३०० +GST, चारचाकी वाहनाच्या टोविंग कारवाईसाठी -रुपये ८०० +GST, क्लॅम्पिंग कारवाईसाठी -रुपये ४०० +GST असे दर निश्चित करण्यात आले आहेत. यासह जीएसटी करही या रकमेवर आकारण्यात येणार आहे. पे अ‍ॅण्ड पार्क व नो पार्किंग झोन हे शहराच्या वाहतुकीला शिस्त लावण्यासाठी आवश्यक असून नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन यशवंत डांगे यांनी केले आहे.

# अहिल्यानगर शहरात अत्याधुनिक यंत्राद्वारे रस्ते स्वच्छतेचा नवा अध्याय

नगर - आमदार संग्राम जगताप यांच्या पुढाकारातून सर्वत्र सिमेंट काँक्रिटीकरणाचे उच्च दर्जाचे रस्ते पूर्ण झाले असून अनेक ठिकाणी काम अंतिम टप्प्यात आहे. या दर्जेदार रस्त्यांची नियमित व आधुनिक पद्धतीने स्वच्छता व्हावी, यासाठी महापालिकेच्या माध्यमातून इंदूर, पुणे व मुंबईच्या धर्तीवर अत्याधुनिक रस्ते स्वच्छता करणाऱ्या यांत्रिक गाड्या उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतला जाणार असल्याची माहिती नगरसेवक अविनाश घुले यांनी दिली.



अविनाश घुले

नगरसेवक घुले म्हणाले की, सध्या महापालिकेच्या माध्यमातून रस्त्यांची स्वच्छता सुरू आहे, मात्र आता शहराच्या वाढत्या विस्ताराला आणि काँक्रिटीकरण झालेल्या रस्त्यांना अनुरूप अशी यांत्रिक स्वच्छता व्यवस्था गरजेची आहे. यासाठी पहिल्याच जनरल बोर्ड मीटिंगमध्ये इंदूर व पुणे-मुंबई पॅटर्नवरील स्वच्छता गाड्या उपलब्ध करून देण्याचा विषय मांडण्यात येणार आहे.



या संदर्भात आमदार संग्राम जगताप यांच्याशी सविस्तर चर्चा झाली असून, नगर शहर अधिक स्वच्छ, सुंदर व आरोग्यदायी करण्यासाठी या गाड्या उपलब्ध करून देण्याबाबत आमदार जगताप यांचाही सकारात्मक दृष्टिकोन असल्याचे घुले यांनी सांगितले. शहरात स्वच्छ वातावरण निर्माण व्हावे, हा या निर्णयामागील मुख्य उद्देश असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

मागील काळात अहिल्यानगर शहरातील अनेक रस्ते अत्यंत खराब अवस्थेत होते. मात्र आमदार संग्राम जगताप यांनी वैयक्तिक लक्ष घालून शहरात उच्च दर्जाचे सिमेंट काँक्रिट रस्ते उभारले. आता या रस्त्यांची योग्य देखभाल आणि स्वच्छता राखण्यासाठी आधुनिक यंत्रसामग्रीचा वापर होणार असल्याने शहराच्या सौंदर्यात भर पडणार आहे.

घुले पुढे म्हणाले की, इंदूर, पुणे व मुंबईमध्ये ज्या प्रकारे रात्रीच्या वेळेस यांत्रिक गाड्यांद्वारे रस्त्यांची स्वच्छता केली जाते, त्याच पद्धतीने अहिल्यानगर शहरातही रात्रीच्या सुमारास या गाड्या फिरतील. रात्री नागरिकांची वर्दळ कमी असल्याने कोणताही अडथळा न होता स्वच्छतेचे काम पूर्ण होईल आणि सकाळपर्यंत शहर स्वच्छ व नीटनेटके दिसेल.

मागील स्वच्छता सर्वेक्षणात अहिल्यानगर महापालिकेला महाराष्ट्रात पाचवा क्रमांक मिळाला होता. आता देशपातळीवर आणि राज्यपातळीवर पाचच्या आत क्रमांक मिळवण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असून, त्यासाठी रस्त्यांची स्वच्छता महत्त्वाची भूमिका बजावणार आहे. ही जबाबदारी महापालिकेची असली तरी नागरिकांनीही सक्रिय सहभाग घेऊन स्वच्छता राखणे तितकेच आवश्यक आहे, असे आवाहन नगरसेवक अविनाश घुले यांनी केले.

# जिल्हास्तरीय दुर्मिळ डाक तिकिटांचे प्रदर्शन

नगर - छत्रपती संभाजीनगर येथे जिल्हास्तरीय डाकघर विभागाच्या वतीने टी. व्ही. सेंटर येथील कैलास शिल्प सांस्कृतिक भवन येथे दुर्मिळ टपाल तिकीट व फर्स्ट डे कव्हर प्रदर्शनाचे आयोजन ३१ जानेवारी ते १ फेब्रुवारी दरम्यान झाले. या प्रदर्शनाचे उद्घाटन महाराष्ट्र-गोवा सर्कलचे चिफ पोस्ट मास्तर जनरल अमिताभ सिंग यांच्या हस्ते ३१ जानेवारी रोजी झाले. या प्रदर्शनात अहिल्यानगर येथील मौलाना आझाद उर्दू गर्ल्स हायस्कुलचे शिक्षक-शिक्षकेतर संघाचे अध्यक्ष ज्येष्ठ टपाल तिकीट संग्राहक अलहज शेख अब्दुल लतीफ अजीज यांच्या दुर्मिळ टपाल तिकीट व फर्स्ट डे कव्हर या दोन संग्राहाला विशेष निमंत्रित करण्यात आले होते. यांचे या संग्रहाबद्दल महाराष्ट्र-गोवा सर्कलचे चिफ पोस्ट मास्तर जनरल अमिताभ सिंग यांनी विशेष कौतुक केले व त्यांना बेस्ट ट्रॉफी व प्रमाणपत्र प्रदान केले.



जिल्हास्तरीय दुर्मिळ डाक तिकीटांच्या प्रदर्शनामध्ये तिकीट संग्राहक अलहज शेख अब्दुल लतीफ अजीज.

या प्रदर्शनास मुंबई, पुणे, नाशिक, जालना येथील डाक तिकीट संग्राहकांनी १२० फ्रेममध्ये २० हजार तिकीटांची मांडणी केली होती. ८०० शालेय विद्यार्थ्यांनी या प्रदर्शनास भेट दिली. त्यांच्या या छंदास समाजातील नागरीकांनी विशेष कौतुक करुन त्यांचे अभिनंदन केले.

# श्री शुक्लेश्वर महादेव मंदिर, भिंगार येथे अखंड हरिनाम सप्ताह

नगर - भिंगार शहरातील श्री शुक्लेश्वर महादेव मंदिर येथे २० फेब्रुवारी पासून महाशिवरात्री निमित्त अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन केले आहे. यावेळी पहाटे ५.३० वा. आरती, सकाळी ९ ते ११ शिवलीला अमृत पारायण, दुपारी १२ ते १ महिला भजनी मंडळ, दुपारी २ ते ५ संत चरित्र, सायंकाळी ५ ते ६ हरिपाठ, सायंकाळी ६.४५ वा. आरती, रात्री ८ ते १० हरिकीर्तन, रात्री ११ वा. हरिजागर सोहळ्याचे आयोजन केले आहे.

याप्रसंगी ह. भ. प. रोहिणीताई परांजपे, ह. भ. प. भास्करदादा महाराज कोळी, ह. भ. प. संजय महाराज पाचपोर, ह. भ. प. सुप्रियाताई साठे, ह. भ. प. संग्रामबापू महाराज भंडारे, ह. भ. प. जयेश महाराज भाग्यवंत, ह. भ. प. बाळकृष्ण महाराज वसंतगडकर तसेच १४ फेब्रुवारी रोजी रात्री १० वा. प्रभुनाथ संगीत विद्यालय मार्फत भजन संध्येचे आयोजन केले आहे.

महाशिवरात्री दिवशी रात्री १२ ते ३ सामुदायिक महारुद्रा अभिषेक होईल तसेच सायंकाळी ६ वा. दिंडी प्रदक्षिणा कार्यक्रम आयोजित केला आहे.

१६ फेब्रुवारी रोजी सकाळी ९ वा. ह.भ.प. विलास महराज मदने, राहुरी यांचे काल्याचे कीर्तन होईल तसेच दुपारी १२ वा. महाआरती व त्यानंतर भक्तानी महाप्रसादाचा लाभ घ्यावा.

# 'परमार्थ निकेतन'मध्ये ९ ते १५ फेब्रुवारीदरम्यान महाशिवरात्री सप्ताह

नगर - बेळगाव निवासी श्री कलावती आई यांच्या मार्गदर्शना प्रमाणे महाशिवरात्री सप्ताहाचे आयोजन ९ ते १५ फेब्रुवारी दरम्यान करण्यात आले आहे. सदर सप्ताह दरम्यान दररोज सकाळी ७ ते ८.३० शिवाराधना प्रात:स्मरण, १०.३० ते १२ शिवाराधना दुपारचा कार्यक्रम, ४ ते ५.३० शिवाराधना सायंस्मरण व संध्याकाळी ७ ते ८.३० या वेळेत शिवाराधना रात्रौस्मरण व प्रशिक्षणा हे कार्यक्रम होणार आहेत. सर्व भजनांना टाळ, संवादिनी व तबल्याची साथ संगत असणार आहे. १५ फेब्रुवारी रोजी महाशिवरात्री उत्सवाची सांगता होईल. परमार्थमार्गप्रदीप भाग - २ मधील उत्सवातील सुमधुर भजने सप्ताह दरम्यान नित्यनेमाने गायली जातील. बंधू-भगिनींनी सप्ताहातील या सर्व उपासनांचा अवश्य लाभ घ्यावा असे आवाहन सिद्धकला विश्वस्त मंडळ, सावेडी यांच्या वतीने करण्यात आले आहे.

या दरम्यान सकाळी ६ ते रात्री १० वाजेपर्यंत भगिनींचे नामस्मरण व रात्री १० ते सकाळी ६ वाजेपर्यंत पर्यंत बंधूंचे अखंड नामस्मरण होईल.

# बेकायदेशीर कत्तलखान्यांवर कारवाईची मोहीम राबवल्याने पोलिस अधीक्षकांचा जिल्ह्यातील गोरक्षकांनी केला सत्कार

नगर - अवघ्या ७ महिन्यांत बेकायदेशीर कत्तलखान्यांवर कारवाईची जोरदार मोहीम राबवत तब्बल दीड कोटी रुपयांचे गोमांस जप्त करून हजारो गोवंशांचे प्राण वाचविल्याबद्दल आणि अनेक गोवंश जनावरांची कत्तल करणाऱ्या गोवंश माफियांना तडीपार करत अहिल्यानगर जिल्ह्यात गोवंशहत्त्याबंदी कायद्याची अत्यंत कडक अंमलबजावणी केल्या बद्दल पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे व स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरण कुमार कबाडी यांचा जिल्ह्यातील गोरक्षकांनी सन्मान केला.



बेकायदेशीर कत्तलखान्यांवर कारवाईची मोहीम राबवल्याने पोलिस अधीक्षकांचा सत्कार करताना जिल्ह्यातील गोरक्षक.

जिल्ह्यातील गोरक्षक शंकर स्वामी, दिनेश दोषी, शुभम शिंदे, शरद कोतकर, हर्षद पारखे, संदीप घेवारी, मयूर ससार आदींनी जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालय येथे पोलीस अधीक्षकांची व स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक व अधिकारी कर्मचारी यांची भेट घेऊन सुंदर गाय-वासराची मूर्ती देऊन गौरव केला.

जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी जिल्ह्याचा चार्ज घेतल्यापासून आज पर्यंत गोवंश संरक्षणासाठी चालवलेल्या या निर्भीड, कठोर व निःस्वार्थ लढ्याला मनापासून सलाम अशा कर्तव्यदक्ष पोलीस अधिकाऱ्यांमुळेच कायद्याचा दरारा निर्माण होतो आणि समाजाला न्याय मिळतो, अशा भावना यावेळी गोरक्षक शिवशंकर स्वामी यांनी व्यक्त केल्या.

यावेळी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकातील सहाय्यक पोलीस निरीक्षक हरीश भोये, पोलीस उपनिरीक्षक मनोज मेंढे, महादेव गुट्टे, अनंत सालगुडे, राजेंद्र वाघ, पोलीस अंमलदार ऱ्हदय घोडके, लक्ष्मण खोकले, भीमराज खर्से, दिपक घाटकर उपस्थित होते.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

